रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १३०
www.ramprahar.com

◆ गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## मनपा निवडणुकीसाठी अंतिम मतदारयाद्या प्रसिद्धीला मुदतवाढ

**मुंबई :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सूचना दाखल करणे तसेच अंतिम मतदारयाद्या प्रसिद्ध करण्याला मुदतवाढ देण्यात आली आहे. यानुसार प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत आता २७ नोव्हेंबरऐवजी ३ डिसेंबर झाली आहे. हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करून प्रसिद्ध करण्याची मुदत ५ डिसेंबरऐवजी १० डिसेंबर, मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करण्याची मुदत ८ डिसेंबरऐवजी १५ डिसेंबर आणि मतदान केंद्रनिहाय मतदारयादी प्रसिद्ध करण्याची मुदत १२ डिसेंबरऐवजी २२ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून आगामी निवडणुकांसाठी हा सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

अंतरंग

कुंभमेळा बोधचिन्हासाठी स्पर्धा; प्रवेशिकांचे आवाहन/२

२२ पोलीस ठाण्यांना आयएसओ मानांकन/६


द. आफ्रिकेचा २५ वर्षांनी ऐतिहासिक विजय/८

# मोदी सरकारकडून महाराष्ट्राला दोन गिफ्ट

### बदलापूर-कर्जत मार्गावर तिसरी, चौथी लाईन टाकणार | पुण्यातही आणखी दोन मेट्रो प्रकल्पांना मंत्रिमंडळाची मंजुरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक बुधवारी (दि. २६) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यापैकी महाराष्ट्रासाठी दोन मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. या निर्णयांमुळे मुंबई, पुणे आणि परिसरातील नागरिकांनादेखील फायदा होईल.



केंद्रीय कॅबिनेट बैठकीत काय काय निर्णय घेतले याबाबत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली. मुंबई उपनगरीय रेल्वेसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेल्या बदलापूर-कर्जत मार्गावर तिसरी आणि चौथी लाईन टाकण्याच्या प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीने मंजुरी दिली आहे. सध्याच्या दोन लाईनमुळे या मार्गावर नेहमीच लोकल वाहतुकीची मोठी कोंडी होते, ज्यामुळे प्रवाशांना खूप त्रास सहन करावा लागतो. ठाणे आणि मुंबईच्या दिशेने दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांसाठी बदलापूर-कर्जत मार्गाचे विस्तारीकरण हा अत्यंत मोठा दिलासा आहे.

मुंबई-पुणे-सोलापूर-वाडी-चेन्नई कॉरिडॉरवरील वाढत्या वाहतूक आणि मालवाहतुकीच्या समस्या सोडवण्यासाठी ३२.४६० किमी लांबीच्या ब्राउनफिल्ड रेल्वे प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत बदलापूर ते कर्जत मार्गावर तिसरी आणि चौथी लाईन सुरू करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा बदलापूर, वांगणी, सेलू, नेरळ, भिवपुरी आणि कर्जत या शहरांना मोठा फायदा होणार आहे.

याचबरोबर पुण्यातील दोन महत्त्वाच्या मेट्रो प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये पहिला मार्ग हा खराडी ते खडकवासला असा, तर दुसरा मार्ग नळ-स्टॉप ते माणिक बाग असा आहे. पुण्यात सध्या लाईन १, लाईन २ए, लाईन २बी आणि लाईन ३ या मेट्रो मार्गिकांचे काम सुरू आहे. यामध्ये मेट्रो लाईन ४ आणि ४ए या आणखी दोन मेट्रो प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. खराडी ते खडकवासला हा लाईन ४ आणि नळ-स्टॉप ते माणिक बाग हा ४ए असा मेट्रो प्रकल्प आहे.

## २६/११च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना मुख्यमंत्र्यांचे अभिवादन



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेला भ्याड दहशतवादी हल्ला परतवून लावताना मुंबई पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी तसेच सुरक्षा दलातील अधिकारी शहीद झाले. या हल्ल्यात वीरमरण आलेल्या शहिदांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदरांजली वाहिली. मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणातील त्यांच्या स्मृती स्मारकास मुख्यमंत्र्यांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

शहीद स्मारक येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमास विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य, उद्योजकता व रोजगारमंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश कुमार, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंग चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि शहीद कुटुंबियांचे सदस्य उपस्थित होते. सर्वांनी पुष्पचक्र अर्पण करून शहिदांना अभिवादन केले.

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी शहिदांच्या कुटुंबियांची भेट घेत त्यांच्याप्रति संवेदना व्यक्त केल्या. अभिवादन कार्यक्रमाचे संचलन परेड कमांडर राखीव पोलीस निरीक्षक रमेश लोखंडे यांनी केले. बँड पथकाचे नेतृत्व पोलीस निरीक्षक संजय कल्याणे यांनी केले. सूत्रसंचालन पोलीस निरीक्षक राजेश खुपकर यांनी केले. कार्यक्रमाला शहिदांचे कुटुंबीय, गृह विभागाचे सेवानिवृत्त सनदी अधिकारी यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## रोजगारांमध्ये भूमिपुत्रांना प्राधान्य देणार : मुख्यमंत्री

**पालघर, डहाणू : प्रतिनिधी**

पालघर आणि डहाणू नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि. २६) प्रचार सभा झाला. या वेळी बोलताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वात या परिसरात वाढवण हे देशातील सर्वात मोठे बंदर उभारण्यात येत आहे. या ठिकाणी निर्माण होणाऱ्या रोजगारांमध्ये भूमिपुत्रांना पहिले प्राधान्य देण्यात येईल.



या सभांना भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, वनमंत्री आणि पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक, खासदार हेमंत विष्णू सवरा, आमदार स्नेहा दुबे, आमदार हरिश्चंद्र भोये, राजेश निकम, प्रमुख नेते, नगराध्यक्षपदाचे उमेदवार, नगरसेवकपदाचे सर्व उमेदवार, इतर पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

स्थानिक मच्छीमार बांधवांसाठी फिशिंग हार्बर उभारण्यात येणार आहे. यासोबतच अनेक विकासकामांचा धडाका सुरू आहे. या विकासचक्राला आणखी गती देण्यासाठी भाजपला साथ द्या, असे आवाहन या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. या सभांना कार्यकर्त्यांसह नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

## शिष्यवृत्ती परीक्षा २२ फेब्रुवारीला

**मुंबई** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता आठवी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२६च्या तारखेत बदल करण्यात आला आहे. आता ही परीक्षा ८ फेब्रुवारी २०२६ ऐवजी २२ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यभर एकाच दिवशी घेण्यात येणार आहे.

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई)तर्फे केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी)देखील ८ फेब्रुवारी रोजी आयोजिण्यात आलेली आहे. राज्यातील अनेक प्राथमिक व माध्यमिक शिक्षक सीटीईटी परीक्षेला बसणार असल्याने त्यांच्याकडून शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख बदलण्याची मागणी करण्यात आली होती.

## निवडक

### दोन कोटी आधार क्रमांक 'यूआयडीएआय'ने केले बंद

**नवी दिल्ली** : भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणने दोन कोटींहून अधिक मृत व्यक्तींचे आधार क्रमांक निष्क्रिय केले आहेत. वास्तविक, या १५ वर्षांच्या काळात करोडोंच्या संख्येने आधारधारक मृत झालेले आहेत, पण त्याची माहिती युआयडीएआयला मिळालेली नसल्याने आजही त्यांचे आधार नंबर सक्रिय आहेत. त्यामुळे या आयडींचा वापर करून अनेक ठिकाणी फसवणूक केली जात आहे. योजनांचा लाभ घेतला जात आहे. म्हणूनच यूआडीआयएने हे पाऊल उचलले आहे.

### भारताला २० वर्षांनी पुन्हा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे यजमानपद

**ग्लासगो** : भारताला २० वर्षांनंतर पुन्हा एकदा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे यजमानपद मिळाले आहे. २०३०मध्ये होणारी शताब्दी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा अहमदाबाद शहरात आयोजित करण्याची घोषणा स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे झालेल्या कॉमनवेल्थ स्पोर्ट जनरल असेंब्लीच्या बैठकीत करण्यात आली. याआधी भारताने २०१०मध्ये नवी दिल्ली येथे या स्पर्धेचे आयोजन केले होते.

## जन्मदिनी तरुणाला जिवंत जाळण्याचा प्रयत्न

### पाच जणांना अटक; पोलीस कोठडीत रवानगी

**मुंबई : प्रतिनिधी**

वाढदिवस साजरा करताना नवनवे उद्योग आणि त्याचे व्हिडीओ करून व्हायरल करायचा प्रकार वाढला आहे. मुंबईतील कुर्ला येथे एका तरुणाला जन्मदिनी जिवंत जाळण्याचा प्रयत्न झाला. या प्रकरणात पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे. ज्या तरुणाला जाळण्याचा प्रयत्न झाला तो जखमी असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अबुल रेहमान मकसूद आलम खान याचा २४ नोव्हेंबर रोजी वाढदिवस होता. हा वाढदिवस साजरा करण्यासाठी पाच मित्रांनी त्याला आमंत्रित केले. रात्री जिथे वाहने पार्क असतात अशा निवांत ठिकाणी भेटायचे ठरले. सर्व जण ठरलेल्या जागेवर पोहचले. या वेळी केक कापण्यात आला. यानंतर शुभेच्छा देण्याऐवजी मित्रांनी वाढदिवस असलेल्या अबुलवर अंडी व दगडांचा मारा केला. थोड्या वेळानंतर अबुलवर मित्रांनी पेट्रोल ओतले. पेट्रोलचा वास येताच अबुल ओरडू लागला. त्याने मित्रांना ओरडतच जाब विचारला, पण मित्रांनी उत्तर दिले नाही.

पाचपैकी तीन जणांनी लायटरच्या मदतीने अबुलला जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. कपड्यांनी पेट घेताच संकटाची जाणीव झाल्यामुळे अबुलने जमिनीवर लोळून आग विझवण्याचा प्रयत्न केला. जवळच असलेल्या इमारतीत राहणाऱ्या एका व्यक्तीने हा प्रकार बघितला. नेमका तो तरुण अबुलला ओळखत होता. धावत तो घटनास्थळी आला. यानंतर अबुलला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या प्रकरणी पोलिसांनी सीसीटीव्ही फूटेज तपासून पाच जणांना अटक केली. आरोपींमध्ये अयाज मलिक, अश्राफ मलिक, कासिम चौधरी, हुझैफा खान आणि शरीफ शेख यांचा समावेश आहे. न्यायालयाने आरोपींना २९ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. अबुलवर झालेला हल्ला पूर्वनियोजित होता की अचानक याचा पोलीस तपास करीत आहेत.

## माणगावजवळ शिवशाही बस आणि ट्रकचा अपघात

### एकाचा मृत्यू, १२ जण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव तालुक्यातील कळमजे परिसरात बुधवारी (दि.२६) सकाळी सव्वासातच्या सुमारास शिवशाही बस आणि सीएनजी सिलिंडर वाहून नेणारा ट्रक यांची जोरदार धडक झाली. या अपघातात एका प्रवाशाचा मृत्यू झाला असून १२ जण जखमी झाले आहेत.



मुंबईवरून मालवणकडे निघालेली शिवशाही बस (एमएच ०९ ईएम ९०७४) आणि महाडवरून पेणच्या दिशेने जाणारा सीएनजी सिलिंडर वाहून नेणारा ट्रक (एमएच ४३ सीके ४३२१) यांची कमळजे नदीपुलाजवळ समोरासमोर धडक झाली. या अपघातात श्याम सुंदर गावडे (वय ८५, रा. विक्रोळी, मुंबई) यांचा मृत्यू झाला, तर इतर १२ जण जखमी आहेत.

जखमींमध्ये दिपाली तुकाराम मोकल (३०, आमटेम, पेण), प्रशांत शशिकांत राजेशिर्के (४०, कोडमला, रत्नागिरी), सुप्रिया सुधाकर मोरे (५५, विक्रोळी मुंबई), अंकुश चंद्रकांत मेस्त्री (५४, आचरा, मालवण), प्रतिभा प्रकाश नागवेकर (५९, संगमेश्वर, रत्नागिरी), आर्या अमित मयेकर (३८, संगमेश्वर, रत्नागिरी), आयशा अमित मयेकर (६, संगमेश्वर, रत्नागिरी), गायत्री अमित मयेकर (१३, संगमेश्वर, रत्नागिरी), अक्षता अनंत पिळणकर (४०, संगमेश्वर, रत्नागिरी), सतीश बुद्धराव शेलार (५२, पाचोळ), राजेंद्र बुद्धराव शेलार (४३, पाचोळ), प्रवीण (३७, नंदुरबार) यांचा समावेश आहे. जखमींवर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघातानंतर महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. पोलिसांनी वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यासाठी प्रयत्न केले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा

## रायगड केंद्राच्या प्राथमिक फेरीचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी सध्या सुरू आहे. त्या अंतर्गत रायगड केंद्राच्या प्राथमिक फेरीचे उद्घाटन बुधवारी (दि. २६) भाजपचे नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे यांच्या हस्ते झाले.





स्पर्धेचे यंदा १२वे वर्ष आहे. नाट्यचळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा अविरतपणे पुढे चालावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ या स्पर्धेची वैशिष्ट्ये आहेत.

स्पर्धेत नवनवीन संकल्पना आणि दर्जेदार एकांकिका सादर होत असल्याने हा करंडक महाराष्ट्रभर सुप्रसिद्ध झाला असून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत स्पर्धेचा आवाका वाढला आहे. गेल्या ११ वर्षांत स्पर्धेने नाट्यविश्वात एक वेगळे स्थान निर्माण केले असून ती नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली आहे.

सीकेटी कॉलेज येथे होत असलेल्या रायगड केंद्राच्या प्राथमिक फेरीच्या उद्घाटन समारंभास संस्कार भारतीचे अमित चव्हाण, प्रा. गीतिका तनवर, प्रा. आढाव, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, गणेश जगताप, अमोल खेर, आदित्य उपाध्ये, निखिल गोरे, कौस्तुभ सोमण, परीक्षक राजा अत्रे, व प्रमोद शेलार यांच्यासह कलाकार, रसिक उपस्थित होते.

दरम्यान, पुणे केंद्राची प्राथमिक फेरी २२ व २३ नोव्हेंबरला झाली. यातून रंगपंढरी पुणे यांच्या 'बरड', कलाकार मंडळी पुणेच्या 'नाटेक' आणि मॉडर्न कॉलेज, गणेश खिंडच्या 'वामन आख्यान' अशा तीन एकांकिकांची अंतिम फेरीमध्ये निवड झाली आहे. (पान २ वर..)

## मालेगावात पुन्हा मुलीवर अत्याचार; आरोपी अटकेत

**मालेगाव : प्रतिनिधी**

मालेगावमध्ये पुन्हा एकदा १३ वर्षीय मतिमंद मुलीवर ५५ वर्षाच्या संशयित आरोपीकडून अत्याचार करण्यात आल्याची निंदनीय घटना घडली आहे. पीडित मुलीला दीपक धनराज छाजेड (रा. मालेगाव, जि. नाशिक) या संशयित आरोपीने फूस लावून त्याच्या स्कुटीवर बसवून एका पडिक जागेवर नेऊन अत्याचार केले.

या प्रकरणी पोलिसांनी अत्याचार व पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला असून या संशयित आरोपीला अटक केली आले. काही दिवसांपूर्वी मालेगावमधील डोंगराळे गावातील तीन वर्षीय बालिकेवर अत्याचार करत तिचा निर्घृण खून करण्यात आला होता.



**रसायनी : येथील वाढीव एमआयडीसीतील सुप्रिया केमिकल या रंग निर्माण करणाऱ्या कंपनीला बुधवारी दुपारी ४च्या सुमारास आग लागली. अग्निशमन दलांनी आगीवर नियंत्रण मिळवले. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी परिसरात काही काळ घबराट निर्माण झाली होती.**

# खोपोलीत महायुतीची जोरदार प्रचार रॅली

**खोपोली : प्रतिनिधी**

आगामी आगामी नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या उमेदवारांनी खोपोली बाजारपेठसह खालची खोपोलीवाडी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर वरची खोपोली व इतर भागात मोठी रॅली काढून शक्ती प्रदर्शन केले, बाजारपेठेत रॅली आल्यानंतर महायुतीच्या जोरदार घोषणा देण्यात आल्या. यामुळे परिसर दणाणून गेला.



प्रभाग क्रमांक पाच चे उमेदवार इंदोरमल खंडेलवाल सोनिया रुपवते तसेच प्रभाग क्रमांक ६चे संजय तन्ना व मयुरी शेलार या उमेदवारांची ही प्रचाराच्या रॅलीच्या अग्रभागी जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार, खोपोली प्रभारी सुनील घरत. खोपोली शहराध्यक्ष अजय इंगुलकर त्याचप्रमाणे खोपोली भारतीय जनता पक्षाचे सर्व शहर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रॅली समाज मंदिर येथे आली असता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना रॅली मधील कार्यकर्त्यांनी संविधान दिनानिमित्त अभिवादन करून डॉक्टर आंबेडकरांच्या जयजयकाराच्या गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. या रॅलीमुळे महायुतीला वातावरण पोषक असल्याचे कार्यकर्त्यांकडून सांगण्यात आले.

# मध्य रेल्वेची अनधिकृत प्रवाशांवर दंडात्मक कारवाई

**रोहा : प्रतिनिधी**

मुंबई विभागातील तिकीट तपासणी पथकाने मेल-एक्सप्रेस व उपनगरी गाड्यांमध्ये ९.६३ लाख विनातिकीट/अवैध तिकीटासह/ बुकिंग न केलेल्या सामानासह प्रवास करणाऱ्या प्रवाशांना पकडले व ४०.५९ कोटी रुपये दंड वसूल केला आहे.

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात मेल-एक्सप्रेस गाड्या, वातानुकुलीत व गैर-वातानुकुलीत उपनगरी गाड्या तसेच स्थानक परिसरातही अनियमित प्रवास रोखण्यासाठी आणि अधिकृत प्रवाशांच्या सुरक्षिततेत व सोयीसाठी नियमित विशेष तिकीट तपासणी मोहीम राबवली जाते.

या विशेष तपासण्यांमुळे अनियमित तिकिटांसह प्रवास करणाऱ्या प्रवाशांची केवळ तपासणी व दंड वसुलीच होत नाही, तर इतरांनीही विनातिकीट प्रवास करू नये असा प्रभावी प्रतिबंध घडतो. आर्थिक वर्ष २०२५-२६ (एप्रिल ते ऑक्टोबर २०२५) दरम्यान, मुंबई विभागाच्या तिकीट तपासणी पथकांनी मेल-एक्सप्रेस गाड्या, उपनगरी गाड्या तसेच वातानुकूलित उपनगरी गाड्यामध्ये मिळून ९.६३ लाख अनियमित प्रवासाच्या प्रकरणांचा तपास करून दंडात्मक कारवाई केली असून, एकूण ४०.५९ कोटी रुपये दंड म्हणून वसूल केले आहेत.

एप्रिल ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीतील प्रकरणे व दंडाची तपशीलवार पहाता यामध्ये वातानुकुलीत उपनगरी गाड्या मधून ७१,०४५ प्रकरणे व २.२८ कोटी रुपये दंड, प्रथम श्रेणी डब्यांमधून ९१,८३७ प्रकरणे व २.९३ कोटी रुपये दंड, द्वितीय श्रेणी डब्यांमधून ६,९८,२४८ प्रकरणे व ३३.६९ कोटी रुपये दंड, मेल व एक्सप्रेस गाड्यांमध्ये भाडेफरकाच्या प्रकरणांमधून १३,३०१ प्रकरणे व ०.७१ कोटी रुपये दंड, बुकिंग न केलेल्या सामानामधून ८८,७१३ प्रकरणे व ०.९८ कोटी रुपये दंड वसुल करण्यात आले. ऑक्टोबर २०२५ महिन्यात एकूण १.३४ लाख अनियमित प्रवासाच्या प्रकरणांची नोंद झाली असून ६.१६ कोटी रुपये दंड वसूल करण्यात आला.

ऑक्टोबर २०२५ मधील प्रकरणे आणि दंड पहाता वातानुकुलीत लोकलमधून ८,९५८ प्रकरणे व २९.२८ लाख रुपये दंड, प्रथम श्रेणी डब्यांमधून १०,६८६ प्रकरणे व ३४.०७ लाख रुपये दंड, द्वितीय श्रेणी डब्यांमधून - १,००,५३५ प्रकरणे व ५.२१ कोटी रुपये दंड, मेल व एक्सप्रेस गाड्यांतील भाडेफरक प्रकरणांमधून ३,१५४ प्रकरणे व १.९२ लाख रुपये दंड, बुकिंग न केलेल्या सामानामधून - ११,१४९ प्रकरणे व १.२५ लाख रुपये दंड वसूल करण्यात आले आहे.

मध्य रेल्वेने मुंबई विभागातील वातानुकुलीत उपनगरी गाड्यांमध्ये आढळणाऱ्या अनियमित प्रवासाच्या समस्या लक्षात घेऊन एक विशेष वातानुकुलीत लोकल तिकीट तपासणी पथक नियुक्त केले आहे.मुंबई उपनगरी विभागात मध्य रेल्वेमार्फत दररोज १,८१० गाड्यांची वाहतूक केली जाते, ज्यामध्ये ८० वातानुकुलीत लोकल सेवा समाविष्ट आहेत. या विशेष पथकाची नियुक्ती प्रवाशांच्या तक्रारींवर तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी करण्यात आली असून, यासाठी २४X७ कार्यरत व्हॉट्सअॅप तक्रार क्रमांक ७२०८८१९९८७ उपलब्ध करून देण्यात आला आहे.

वातानुकुलीत लोकल तिकीट तपासणी पथक दररोज सुमारे ३६८ विनातिकीट/अवैध तिकीटधारक प्रवाशांवर कारवाई करून सरासरी रु.१.१९ लाख दंडाची वसुली करते. मध्य रेल्वे सर्व प्रवाशांना आवाहन करते की गैरसोयी व दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी योग्य व वैध तिकिटे खरेदी करून जबाबदारीने आणि सन्मानाने प्रवास करावा. रेल्वे प्रशासनाने विनातिकीट प्रवासाविरुद्धची शून्य-सहिष्णुता धोरण पुन्हा अधोरेखित केले असून, प्रवाशांना आरामदायी व सन्मानपूर्वक प्रवास अनुभव मिळावा यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

# श्री गुरू तेग बहादूर यांचा शहिदी समागम कार्यक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

'हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर' यांच्या ३५०व्या शहिदी समागम वर्षानिमित्त देशभर विविध प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रमाचे आयोजन जानेवारी महिन्यात नांदेड येथे करण्यात आले असल्याची माहिती 'हिंदी दी चादर श्री गुरू तेग बहादूर ३५० व्या शहिदी समागम' राज्यस्तरीय समितीने दिली आहे.

श्री गुरू तेग बहादूर हे शीख समाजाचे नववे गुरू आहेत. मानवाधिकारांच्या सुरक्षेसाठी काम करीत असताना ते शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, मानवता, करूणा आणि धैर्य या मूल्यांचा संदेश दिला. त्यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त महाराष्ट्र शासन आणि हिंदी दी चादर श्री गुरू तेग बहादूर ३५० व्या शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या संयुक्त विद्यमाने ७ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, २१ डिसेंबर रोजी नवी मुंबई येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तर, जानेवारीमध्ये नांदेड येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# सीकेपी समाजासाठी एकविरा देवी दर्शन सोहळा

**पुणे : प्रतिनिधी**

लोणावळा, कार्ला येथील एकविरा देवीच्या गडावर एक दिवस कायस्थांचा सोहळा शनिवार २९ नोव्हेंबर रोजी होणार असून देशभरातील चांद्रसेनिय कायस्थ प्रभू (सीकेपी) मंडळी या सोहळ्यासाठी उपस्थित राहणार आहेत. गेली ९ वर्षे सीकेपी समाज हा लोकप्रिय सोहळा आयोजित करीत आहे.

लोणावळा कार्ला येथील श्री एकविरा देवी सीकेपी समाजाची कुलदेवता म्हणून ओळखली जाते. २०१७ पासून कार्ला येथील एकविरा देवीचा उत्सव साजरा करणे सुरु झाले. गेल्या नऊ वर्षांची परंपरा यावर्षीही सुरु असून 'एक दिवस कायस्थांचा' उत्सव शनिवारी होणार आहे.



२९ नोव्हेंबर रोजी सकाळी ५.३० वाजता सीकेपी ज्ञातीतर्फे एकविरा आईचा अभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर ६ वा. एकविरा गडाकडे पालखी रवाना होणार आहे. नंतरचे सर्व कार्यक्रम गडाच्या पायथ्याशी असलेल्या एकविरा ड्रिम व्हिला येथे होणार आहे. अभिषेक, एकविरा आई यज्ञ, गोंधळ व महाआरती, त्यानंतर खास सीकेपी पध्दतीचा शाकाहारी व मांसाहारी महाप्रसाद होणार आहे. सदरचा महाप्रसाद उद्योजक अर्जुन देशपांडे यांच्या सहकार्याने होणार आहे.

प्रारंभी होमहवन होणार असून गोंधळ, महाआरती, मान्यवरांचे सत्कार, महाप्रसाद अशा भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवासाठी पुणे, महाड, कल्याण, डोंबिवली, बदलापूर, भिवंडी, ठाणे, बोरीवली इ. ठिकाणाहून विशेष बस सेवा उपलब्ध करण्यात आली आहे.

या उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन उत्सवाचे प्रमुख आयोजक तुषार राजे, रघुवीर देशमुख, विकास देशमुख, राजेश देशपांडे, जयदिप कोरडे, निलेश गुप्ते, स्वप्निल प्रधान, मंदार कुळकर्णी, मिलिंद मथुरे, अशोक कुळकर्णी, सागरिका कर्णिक, अजंली प्रधान आदींनी केले आहे.

# बीसीटी लॉ कॉलेजमध्ये राष्ट्रीय संसदीय वादविवाद स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगु ठाकूर विधी महाविद्यालयाच्या वादविवाद समितीतर्फे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या औचित्याने राष्ट्रीय संसदीय वादविवाद स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

लोकनेते रामशेठ ठाकूर हे दूरदर्शी नेतृत्व असलेले, लोककल्याण आणि राष्ट्रनिर्मितीला आपले संपूर्ण आयुष्य वाहिलेले माननीय खासदार होते. त्यांचे कार्य तरुण विद्यार्थ्यांना चिकित्सक विचार करण्यास तसेच जबाबदारीने नेतृत्व करण्यास सतत प्रेरित करते. या स्पर्धेत B.A.LL.B आणि LL.B या दोन्ही अभ्यासक्रमांमधून एकूण १० संघांनी सहभाग घेतला. पक्षवाटप



लकी ड्रॉ (चिठ्ठी पद्धत) द्वारे पूर्णपणे निष्पक्षरीत्या करण्यात आले. विद्यार्थ्यांनी संसदीय पोशाखात शिस्तबद्धपणे उपस्थित राहून उत्साह, आत्मविश्वास आणि गांभीर्याने सहभाग नोंदवला.

राष्ट्रीय संसदीय वादविवाद स्पर्धा २०२५-२६ परीक्षक : सभापती - सहाय्यक प्राध्यापक संग्राम पवार, परीक्षक - सहाय्यक प्राध्यापक सूरज भालेराव तर प्रथम फेरीनंतर ६ संघ दुसऱ्या फेरीत प्रवेशले, ज्यामध्ये ३ सत्ताधारी पक्षाचे आणि ३ विरोधी पक्षाचे प्रतिनिधित्व करत होते. त्यानंतर प्रत्येकी एका पक्षातून २ संघांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. सनवी देशमुख मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली, B.A.LL.B समन्वयक सहाय्यक प्राध्यापक धनश्री कदम मॅडम, वादविवाद समिती प्रमुख सहाय्यक प्राध्यापक ऐश्वर्या पाटोळे आणि वादविवाद समिती समन्वयक सहाय्यक प्राध्यापक नेहा काची यांच्या सहकार्याने करण्यात आले.

ही स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी एक समृद्ध शैक्षणिक अनुभव ठरली ज्यामुळे कायदेशीर ज्ञान, वादसंस्कृती, आत्मविश्वास आणि संवादकौशल्य यांना उत्तेजन मिळाले.

# २६/११च्या हल्ल्यातील शहिदांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

२६/११ हा मुंबईच्या इतिहासातील एक काळा दिवस आहे. या भ्याड दहशतवादी हल्ल्याचे जखम आजही भरू शकत नाहीत. या हल्ल्यात अनेक निरपराध आणि निष्पाप नागरिकांनी आपले प्राण गमावले.

या हल्ल्यात खारघरचे रहिवासी पोलीस कॉन्स्टेबल शहीद योगेश पाटील यांनीही वीरमरण प्राप्त केले. नवी मुंबईच्या कंदश विकास फाउंडेशनचे हाजी शहनवाज खान यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. खारघर येथील श्री



शिवाजी पाटील यांनी आपल्या पुत्र शहीद योगेश पाटील यांच्यासह सर्व शहीदांना विनम्र आदरांजली अर्पण केली आणि जगात शांतता आणि सौहार्द कायम राहावे, अशी प्रार्थना केली. २६/११ ला मुंबईवर झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात वीरमरण प्राप्त सर्व शहीदांना विनम्र श्रद्धांजली वाहिली.

# जनता महायुतीला साथ देईल -मिलिंद पाटील

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची रणधुमाळी चांगलीच वाढली असून सर्वच प्रभागात उमेदवारांचा प्रचार जोरात सुरू आहे. भाजप-राष्ट्रवादी-आरपीआय महायुतीचे उमेदवार दरवाजापर्यंत पोहोचत मतदारांशी संवाद साधत आहेत. प्रभाग क्रमांक ४ चे उमेदवार सागर सदाशिव पवार आणि हर्षा अनिरुद्ध पाटील यांच्या प्रचाराला आज नारळ फोडून आणि जोरदार घोषणाबाजीने सुरूवात झाली.

प्रभाग ४ मध्ये सागर पवार आणि हर्षा पाटील यांना मिळत असलेला वाढता प्रतिसाद लक्षात घेता दोन्ही उमेदवार भरघोस मतांनी विजयी होतील, अशी चर्चा मतदारसंघात सुरू आहे. स्थानिक विकास कामांबाबत जनतेने व्यक्त केलेला विश्वास आणि उमेदवारांची सक्रियता या निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रीतम ललित पाटील या 'जनतेचा विकास हा मुख्य अजेंडा' घेऊन निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत. त्या प्रत्येक मतदाराचा



आशीर्वाद घेण्यासाठी प्रत्यक्ष भेटीगाठी घेत आहेत.

या वेळी जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाटील यांनी सांगितले की, पेण न.प. निवडणुकीसाठी सामोरे जाताना भाजप, राष्ट्रवादी कॉंग्रेस, आरपीआय व मित्रपक्ष यांच्या माध्यमातून निवडणूक लढविताना महायुतीचे सहा उमेदवार बिनविरोध निवडून आले असून आमदार रविशेठ पाटील, खासदार सुनील तटकरे, खासदार धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते जोमाने प्रचार करीत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पेण शहराला नेहमी झुकते माप दिले असून आमदार रविशेठ पाटील यांनी मोठ्या प्रमाणात पेणसाठी निधी आणण्याचे काम केले. पेणमध्ये शाश्वत विकासकामे करून चेहरा मोहरा बदलण्याचे काम केले असून जनता विकासाला साथ देईल व महायुतीचे सर्वच्या सर्व उमेदवार निवडून येतील असे मिलिंद पाटील यांनी सांगितले.

या वेळी प्रितम पाटील आणि सांगितले की, गेली अनेक वर्षे जनतेशी नाळ जुळलेली आहे. आमची कामे जनतेच्या साक्षीने पारदर्शक आणि स्वच्छ हेतूने झाली आहेत. यासाठी जनतेचा आशीर्वाद घेण्यासाठी आज प्रचार करीत आहोत. आमचा कामाचे साक्षीदार येथील जनता आहे. यामुळे आमचे सर्व उमेदवार भरघोस मतांनी विजयी होतील.

# पनवेल महापालिकेत संविधान दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात बुधवारी (दि.२६) 'संविधान दिवस' निमित्त भारतीय संविधानाच्या उद्दिशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. या वेळी आयुक्त मंगेश चितळे यांनी आपल्या संविधान उद्देशिकेबाबत जाणीव जागृती निर्माण व्हावी, स्वातंत्र्य, समता, बंधुता याबाबत सजग होण्याच्या उद्देशाने या संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आल्याचे सांगितले.

या वेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त रवीकिरण घोडके, उपायुक्त स्वरूप खारगे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सचिव अक्षय कदम, महापालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पनवेल महानगर पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनुसार तसेच अतिरिक्त आयुक्त (शिक्षण) महेशकुमार मेघमाळे यांच्या मार्गदर्शनानुसार बुधवारी संविधान दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये बालसभांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले तसेच संविधान पुस्तिकेचे पूजन करण्यात आले. या वेळी संविधानाची निर्मिती,त्याचे महत्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच सर्व शाळांमध्ये सामूहिकपणे संविधान उद्दशिकेचे वाचन करण्यात आले.

शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या सूचनेनूसार संविधानाची ओळख व महत्व आजच्या पिढीला करून देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये मुख्यध्यापक, शिक्षकवृंदानी विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये सर्व शाळांध्ये निबंध, भाषण, चित्रकला, रंगभरण स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच काही शाळांमध्ये नृत्य, पथनाट्य सादरीकरण करण्यात आले.

पान १ वरुन

# राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा

यानंतर २८ नोव्हेंबरपासून मुंबई केंद्रांची प्राथमिक फेरी होणार असून महाअंतिम फेरी ५, ६ व ७ डिसेंबरला पनवेलमधील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. अंतिम फेरीतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये, प्रमाणपत्र व मानाचा अटल करंडक तसेच कलाकारांना पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे.

# ढाब्यावर जेवताना एकाचा मोबाईल चोरला

**पनवेल : वार्ताहर**

ढाब्यावर जेवण करण्यासाठी गेले असता, मोबाइल चोरीला गेल्याची घटना कामोठे येथे घडली. याप्रकरणी कामोठे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विवेक गुरव हे खारघर येथे राहत असून, ते आणि त्यांचा मित्र अजय पार्ले हे म्हात्रे ढाबा, स्मशानभूमी जवळ, कामोठे याठिकाणी जेवण करण्यासाठी गेले होते. त्यांनी मोबाईल हॉटेलमधील टेबलवर ठेवला होता. जेवण केल्यावर हात धुण्यासाठी गेले, तितक्या वेळात त्यांचा मोबाईल गायब झाल्याचे लक्षात आले.

# कुंभमेळा बोधचिन्हासाठी स्पर्धा; प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**

श्रद्धा, पावित्र्य आणि अध्यात्माचा संगम असलेला सिंहस्थ कुंभमेळा नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणार आहे. यानिमित्त नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणातर्फे बोध चिन्ह स्पर्धेचे (लोगो डिझाईन) आयोजन करण्यात आले आहे.


स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे अनुक्रमे तीन, दोन आणि एक लाख रुपयांच्या पारितोषिकांसह प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी २० डिसेंबर २०२५ पर्यंत प्रवेशिका पाठविता येणार असून देशभरातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी केले आहे.

बोधचिन्हासाठी कमाल आकार ५ एमबी (पीडीएफ) असावा. स्पर्धेत दिलेल्या लेआउटनुसार बोधचिन्हाची डिझाइन ए १ आकाराच्या पोस्टरवर असावे. बोधचिन्हाची रंगीत, कृष्णधवल प्रतिमा आणि बोधचिन्हाबाबत माहिती देणारी १५० शब्दांची टिपणी असावी. स्वाक्षरी केलेल्या आणि स्कॅन केलेल्या अटी आणि शर्तींची कमाल आकार १ एमबी (पीडीएफ) फाइल. संकल्पना टीप, पोस्टर, प्रतिमा, फाइल नावासह, अर्जदाराची ओळख स्थापित करण्यासाठी नाव, संस्थेचे नाव किंवा कोणतेही संदर्भ यासारखी कोणतीही वैयक्तिक माहिती नसावी. या निकषांचे पालन न करणाऱ्या नोंदी अपात्र ठरवल्या जातील.

सहभागींनी दोन स्वतंत्र फाइल्स सादर कराव्यात. योग्यरित्या स्वाक्षरी केलेले घोषणापत्र नसल्यास, प्रवेशिका अपात्र ठरवली जाईल. ही स्पर्धा भारतातील प्रत्येक नागरिकासाठी खुली आहे. ही स्पर्धा व्यावसायिक डिझायनर्स, कलाकार, ब्रॅण्ड डिझायनर्स आणि नाविन्यपूर्ण कल्पना मांडू शकणाऱ्या सर्वांसाठी खुली आहे. बोधचिन्हाची दृश्य ओळख विशिष्ट ओळख घटकांसह प्रदर्शित केलेली पाहिजे. रंगांचा पॅलेट, दृश्य आकृतिबंध, टाइपफेस, दृश्य अँकर आणि त्याचे अनुप्रयोग जसे की, साइनेज, ब्रँडिंग, स्ट्रीट फर्निचर, प्रवेश पास, स्टेशनरी, झेंडे, व्यापारी माल इत्यादींवर दाखवले पाहिजे. अधिक माहितीसाठी www.mygov.in किंवा ntkmalogocompetition@gmail.com या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा.

## दुखवटा

# ओवी म्हात्रे



**उरण :** सामाजिक कार्यकर्ते व मनसे कार्यकर्ते हेमंत सदानंद म्हात्रे नवीन शेवा यांची मुलगी ओवी हेमंत म्हात्रे हिचे सोमवारी (दि.१७) निधन झाले आहे. कै.ओवीचे दिवस कार्य विधी शुक्रवारी (दि.२८) तीच्या घरी नवीन शेवा येथे सकाळी १०:३० वाजता होणार आहे.

# नवीन दिवाणी न्यायाधीश इमारतीवरील दोन मजल्यांचे काम होणार सुरू

## पनवेल वकील संघटनेच्या पाठपुराव्याला यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील नवीन दिवाणी न्यायाधीश न्यायालयीन इमारतीवर दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याच्या प्रत्यक्ष बांधकामाला लवकरच सुरुवात होणार असून यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे अध्यक्ष अ‍ॅड. पारिजात पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अ‍ॅड. मनोज भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली पनवेल वकील संघटनेचा सातत्यपूर्ण पाठपुरावा कामी आला आहे. या बांधकामासाठी १० कोटी १६ लाख ५७ हजार ८९४ रुपये खर्च केले जाणार आहेत.



पनवेल मधील नवीन कोर्ट इमारतीवर दोन मजले बांधण्याकरिता निधीची तरतूद करण्याची आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती तसेच या संदर्भात त्यांनी व बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे अध्यक्ष अ‍ॅड. पारिजात पांडे आणि पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष अ‍ॅड. मनोज भुजबळ आणि सहकाऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्या प्रयत्नांना यश आले असून याचा वकील, पक्षकार, नागरिकांना फायदा होणार आहे.

पनवेल येथील नवीन इमारतीमध्ये सह दिवाणी न्यायालय व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पनवेल हे सहा कोर्ट तसेच दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर हे चार कोर्ट, जिल्हा व अति सत्र न्यायालय चार कोर्ट, तसेच पोस्को न्यायालय एक असे एकूण १५ न्यायालये आहेत, परंतु नवीन कोर्टामध्ये तळमजला अधिक एक मजला असे एकूण प्रत्यक्षात आठ कोर्ट हॉल असून त्यामध्ये सद्यस्थितीत दाटीवाटीने १५ कोर्ट कार्यान्वित असून सात न्यायालयांना रितसर कोर्ट हॉल उपलब्ध नाही. आणि त्याकरीता नवीन इमारतीमध्ये असलेली वकीलांची लायब्ररी तसेच कॅटींगमध्ये सिव्हिल प्रीझोनमध्ये कोर्ट बसवण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली. पनवेल न्यायालयाकरिता मंजूर न्यायाधीश, वकील व न्यायालयात येणारे पक्षकार यांच्या तुलनेने सध्याची इमारत अपुरी पडत आहे. त्यामुळे न्यायालयीन कामकाजासाठी येणाऱ्या सर्वांना अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची बाब आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल वकील संघटनेच्या सोबतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून देत न्यायालय इमारतीवर दोन मजले बांधकामासाठी जास्तीत जास्त आर्थिक निधीची तरतूद करण्याची मागणी केली होती, त्यानुसार राज्य शासनाने या कामासाठी खर्चाच्या कामाला प्रशासकीय मान्यता दिली होती. त्यानंतर या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा जाहीर होऊन सदरच्या कामाचा ठेका उल्हासनगर येथील रचना कंट्रक्शन या कंपनीला मिळाला आहे.

आता या कामाची प्रत्यक्ष सुरुवात होणार असून एक वर्ष कालावधीत हे काम पूर्ण केले जाणार आहे. त्यामुळे दोन मजली विस्ताराचे काम मार्गी लागणार असून पनवेल परिसरातील न्यायालयीन कामकाज अधिक सुलभ, सुटसुटीत व सर्वसमावेशक होणार आहे.

> **पनवेल न्यायालयाच्या वाढत्या कामकाजाला न्याय देण्यासाठी अतिरिक्त मजल्यांची अत्यंत गरज होती. या कामाला येत्या महिन्यात सुरुवात होणार असून ते पनवेल वकील संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित आहे. आमदार प्रशांत ठाकूर आणि बार कौन्सिलचे अध्यक्ष अ‍ॅड. पारिजात पांडे यांच्या प्रभावी मार्गदर्शनामुळे हा महत्त्वाचा टप्पा गाठता आला. दोन नवीन मजल्यांमुळे न्यायालयीन प्रक्रिया अधिक सुलभ, सुटसुटीत होणार असून वकील, न्यायाधीश आणि पक्षकारांना मोठा दिलासा मिळणार आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार प्रशांत ठाकूर, बार कौन्सिलचे अध्यक्ष ऍड. पारिजात पांडे, पनवेल वकील संघटनेचे सहकारी यांचे मनापासून आभार मानतो.**
>
> **–अ‍ॅड. मनोज भुजबळ, अध्यक्ष, पनवेल वकील संघटना**

# पनवेलमध्ये संविधान दिन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या संविधानस्वीकृती दिनानिमित्त पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात बुधवारी (दि. २६) संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, अनेश ढवळे, अंकुश पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रास्ताविक करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादनाने झाली.

या वेळी भूपेंद्र पाटील यांनी संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करून लोकशाही, न्याय, समता, स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.



**कळंबोली : संविधान दिनानिमित्त भाजप शहर मंडळतर्फे भारतीय संविधानाच्या उद्दिशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. या वेळी मंडळ अध्यक्ष अमर पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये आरोग्य तपासणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि.२६) राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अपोलो हॉस्पिटल बेलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.



या शिबिरात विद्यार्थ्यांसह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदविला. या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये अपोलो हॉस्पिटलच्या वैद्यकीय तज्ज्ञांच्या टीमने सर्व सहभागींचे रक्तदाब, हृदयगती, बी एम आय, साखर तपासणी आदी मूलभूत आरोग्य तपासण्या करून मार्गदर्शन केले. या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवकांनी शिबिराचे नियोजन, नोंदणी व मार्गदर्शनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. या नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व आणि निरोगी जीवनशैली स्वीकारण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी अपोलो हॉस्पिटल व राष्ट्रीय योजना विभाग यांच्या पुढाकाराचे कौतुक करत भविष्यातही असे सामाजिक उपक्रम राबविण्याची गरज व्यक्त केली. या शिबिराचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर, समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांनी केले तसेच समितीतील इतर सर्व सदस्य, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## बेलवलीत घरफोडी

**पनवेल :** बेलवली येथे घरफोडी करत १५ ग्राम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र आणि पाच हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बेलवलीतील राघो पांडुरंग पाटील हे मुलाच्या घरी नांदिवली, कल्याण येथे गेले होते. घरी परतले असता कडी-कोंयडा तुटलेला दिसला. तसेच घरातील कपाटातील मंगळसूत्र आणि रोख रक्कम गायब असल्याने त्यांनी पोलीस तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

# उरणमध्ये रविवारी रक्तदान शिबिर

**उरण : बातमीदार**

कस्टम हाऊस एजन्ट (सीएचए)च्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या व मराठी स्थानिक भूमीपुत्रांची संघटना असलेल्या न्हावा शेवा सी एच ए आधार सामाजिक संस्थेतर्फे सामाजिक बांधिलकी जपत देशातील थलेसेमिया, अपघातग्रस्त रुग्ण व दुर्गम आजारावरील शस्त्रक्रियासाठी लागणाऱ्या रक्ताची गरज लक्षात घेता रविवारी (दि.३०) सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन (उरण) येथे तेरणा ब्लड बँक नेरूळ यांच्या सहकार्याने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

इच्छुक रक्तदात्यांनी न्हावा शेवा सीएचए आधार सामाजिक संस्थेच्या पदाधिकारी सदस्यांशी संपर्क साधून नाव नोंदणी करून रक्तदान शिबिरात सहभागी होऊन मोठया प्रमाणात रक्तदान करावे, असे आवाहन न्हावा शेवा सीएचए आधार सामाजिक संस्थेतर्फे करण्यात आले आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी रूपेश भगत (९६१९३९५२९२), श्याम गावंड (९६६४०३४३४७), हनुमान म्हात्रे (९८६७८८६४८०) या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एलएलबीच्या विद्यार्थ्यांचा खांदेश्वर पोलीस ठाण्यात अभ्यास दौरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी कॉलेजमधील प्रथम वर्ष एल.एल.बी. वर्गातील एकूण १२० विद्यार्थ्यांनी २१ नोव्हेंबर रोजी खांदेश्वर पोलिस ठाण्याला शैक्षणिक भेट दिली. हा अभ्यासदौरा आदरणीय प्राचार्या डॉ. सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक प्राध्यापिका आनाम मेहंदिकर आणि नेहा काची यांच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पडला.



भेटीदरम्यान हवालदार मुल्ला सर यांनी विद्यार्थ्यांना पोलिस ठाण्याच्या दैनंदिन कामकाजाबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने अनेक प्रश्न विचारले. गुन्ह्यांचे प्रकार, जामीन योग्य-अजामीनयोग्य गुन्ह्यातील फरक, साक्षीदारांच्या संरक्षण, तक्रारींची तातडीची दखल, इत्यादी महत्त्वाच्या विषयांवर संवाद साधला. मुल्ला सरांनी सर्व प्रश्नांना संयमपूर्वक व अत्यंत स्पष्टपणे उत्तरे दिली.

खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या कर्मचारीवर्गाने विद्यार्थ्यांचे मनापासून स्वागत केले आणि संपूर्ण दौऱ्यात पूर्ण सहकार्य केले. त्यांनी कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर पोलीस दलाची जबाबदारी, समाजातील भूमिका आणि नैतिक कर्तव्य अधोरेखित केले. ही भेट यशस्वीपणे आयोजन करण्यामागे प्राचार्या डॉ. सानवी देशमुख, सहाय्यक प्राध्यापिका आनाम मेहंदिकर आणि नेहा काची यांचे विशेष मार्गदर्शन आणि परिश्रम कारणीभूत ठरले.

# भाजप खारघर मंडळातर्फे संविधान दिन साजरा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप खारघर शहर मंडळाच्या वतीने संविधान दिन मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात संविधान निर्माते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर संविधान पुस्तिकेचे पूजन व सामूहिक संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.



कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित जेष्ठ विचारवंत प्रभाकर तिजारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा उल्लेख करताना सांगितले की, डॉ. आंबेडकरांनी दाखवलेला न्याय, समता व बंधुतेचा मार्ग देशाच्या विकास प्रक्रियेला आजही दिशा देणारा आहे. सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सबलीकरणाद्वारे प्रत्येक घटकाला न्याय देणे हा त्यांचा मूलभूत विचार असून, तो आजच्या धोरणांमध्येही पुढे नेण्याचा प्रयत्न दिसून येतो.

या वेळी मंडळाचे सरचिटणीस दीपक शिंदे यांनी भारताची जगातील सर्वांत मोठी लिखित राज्यघटना विविध धर्म, जाती, भाषा आणि संस्कृतींना एकत्र बांधण्याचे कार्य कसे करते, याबाबत आपले विचार व्यक्त केले. प्रदेश मीडिया सह-संयोजिका बीना गोगरी, प्रभाग ५ अध्यक्ष अजय माळी, नगरसेविका आरती नवघरे व किरण पाटील यांनीही संविधान दिनाचे महत्त्व सांगत उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमादरम्यान अनुसूचित जाती समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणारे सुरेश कांबळे, शरद कांबळे, जनार्दन लाखन आणि संजय सुर्वे यांचा मंडळाच्या वतीने सत्कार करून गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, अ‍ॅड. नरेश ठाकूर, किरण पाटील, ब्रिजेश पटेल, प्रभाग ४ अध्यक्ष वासुदेव पाटील, उपाध्यक्ष दत्ता ठाकूर, प्रभाग ५ अध्यक्ष अजय माळी, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष संदीप माघाडे, तसेच प्रभाकर तिजारे, सुरेश कांबळे, भागवत गायकवाड, शरद कांबळे, जनार्दन लाखन, संजय सुर्वे, केतन नवघरे, सिद्धेश खडकर, आदित्य हातगे तसेच महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, माजी नगरसेविका आरती नवघरे, हर्षदा उपाध्याय, मंडल उपाध्यक्षा सीमा खडकर, सचिव अश्विनी भुवड, प्रदेश सोशल मीडिया सह-संयोजिका बीना गोगरी, तसेच रजनी शर्मा, सुशीला शर्मा, शिक्षक सेल संयोजिका दुर्गा अंजुरे, ममता आचरेकर, राजवत रयत, जया बागडी, बबिता सिंग आदी कार्यकर्त्यांनी उपस्थिती दर्शवली.

# फुंडे विद्यालयात संविधान दिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य बी.बी साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली ७६ वा संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका एस.डी थोरात, पर्यवेक्षिका एस.एस पाटील ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख बी.पी पाटोळे, झेड. एच.माने व उपस्थित शिक्षक वृंदांच्या शुभहस्ते भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी राधिका खामकर व सर्व विद्यार्थ्यांनी संविधानाचे सादरीकरण केले. उपस्थितांच्या स्वागतानंतर विद्यालयातीलश्रेया खामकर व स्नेहल केदार या विद्यार्थिनीने संविधानाचे महत्त्व सांगितले.त्यानंतर विद्यालयातील उपशिक्षिका डी.जे सुतार यांनी भारतीय संविधानाचे सविस्तर महत्त्व सांगितले.

विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.एन पाटील यांनी संविधानावर आधारित गाण्याचे सादरीकरण केले. भारतीय संविधान लेखन स्पर्धा घेण्यात आली. पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी अशा दोन गटात स्पर्धा घेण्यात आली. लहान गट प्रथम क्रमांक सायराज घरटकर, द्वितीय क्रमांक रुद्रा धुमाळ, तृतीय क्रमांक अनुष्का भिलारे मोठा गट प्रथम क्रमांक सलोनी बोर्ले, द्वितीय क्रमांक अनुष्का राऊत व तृतीय क्रमांक तृप्ती चव्हाण या सर्वांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. सूत्रसंचालन श्रेया शिंदे व आभार उपशिक्षक पी. ए पाटील यांनी मानले.

# पनवेल महापालिकेच्या अक्षय ऊर्जा प्रोत्साहन उपक्रमाचा समारोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत पनवेल महापालिकेमार्फत अक्षय ऊर्जा प्रोत्साहन उपक्रमाचा समारोप रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय खारघर येथे नुकतेच करण्यात आला. या उपक्रमांतर्गत पर्यावरण विषयावर आधारित निबंध लेखन, पोस्टर बनविणे, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, पॅनेल चर्चा, तज्ज्ञ चर्चा, यांसारख्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.




या उपक्रमाचा उद्देश नागरिकांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये अक्षय ऊर्जेचे महत्त्व, ऊर्जा संवर्धन, पर्यावरणपूरक जीवनशैली आणि हरित उपक्रमांविषयी जनजागृती निर्माण करणे हा आहे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची भावना दृढ करण्यादृष्टीने ई-वेस्ट संकलन मोहिम, लघुपट प्रदर्शन आणि वृक्षारोपण कार्यक्रम आयोजन या उपक्रमांतर्गत करण्यात आले. तसेच दोन दिवस घेतलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या उपक्रमांच्या समारोपावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक संजय भगत, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर व रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य संतोष खांडेकर, पनवेल मनपा पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२४ व २५ नोव्हेंबर असे दोन दिवस हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये अक्षय ऊर्जेचा वापर वाढविणे, हरित ऊर्जेचे महत्त्व अधोरेखित करणे आणि पर्यावरण रक्षणासाठी सामूहिक सहभाग घडवून आणणे हे या उपक्रमाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

## एटीएमद्वारे फसवणूक

**पनवेल :** एटीएमद्वारे २० हजार रुपये काढून फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दत्तू नरळे हे पळस्पे गावात राहतात. ते एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते, मात्र पैसे न आल्याने एटीएमच्या बाहेर थांबलेला एकाने मदतीच्या बहाण्याने त्यांचा पीन घेतला. मात्र पैसे आलेच नाही. नरळे बाहेर गेल्यावर थोड्यावेळाने त्यांचा बँक खात्यातून पैसे काढल्याचे मेसेज आले. त्यांनी एटीएम कार्ड पाहिले असता, ते दुसरेच कार्ड होते. त्यांच्या खात्यातून २० हजार रुपये काढण्यात आले होते.

## संपादकीय

# प्रदूषणाचा विळखा

दिल्लीत सध्या हवेच्या प्रदूषणामुळे सरकारी कार्यालयांमध्ये केवळ ५० टक्के कर्मचाऱ्यांनी यावे व इतरांनी घरून काम करावे असे आदेश जारी केले गेले आहेत. दिल्ली आणि राजधानी क्षेत्रात गेले अनेक दिवस हवेची गुणवत्ता (एक्यूआय) 'अत्यंत खराब' नोंदली जाते आहे. दिल्लीपाठोपाठ आता मुंबईतील हवेचा दर्जाही खालावल्याचे समोर येते आहे. दोन्ही महानगरांमध्ये प्रशासनाने हवेच्या प्रदूषणासंदर्भात कठोर उपाययोजनेचा निर्णय घेतला आहे.

**केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार दिल्लीतील हवा गुणवत्ता निर्देशांक मंगळवारी ३६० म्हणजे 'अत्यंत खराब' तर सोमवारी काही भागांत ४१६ ते ३८२ इतका होता. यामुळेच राजधानीतील प्रदूषणासंदर्भात आता थेट पंतप्रधान कार्यालय सक्रिय झाले आहे. नुकताच पंतप्रधानांच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत या संदर्भात नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाईचा निर्णय घेण्यात आला. दिल्लीशेजारच्या राज्यांत शेतात काडीकचरा जाळला जातो. परिणामी दर हिवाळ्यात राजधानीत हवेचा दर्जा खालावतो. यासोबतच मुदत संपलेल्या व डिझेल वाहनांचा धूर, बांधकामांच्या ठिकाणची धूळ यांमुळेही प्रदूषणात भर पडते. ही कारणे लक्षात घेऊन कठोर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. अशीच प्रदूषणाची ओरड आता मुंबईतही सुरू आहे. कारण गेले काही दिवस सकाळच्या वेळी मुंबईत दाट धुरके दिसते. दिवसा सहज नजरेला पडणाऱ्या इमारती सकाळच्या वेळी धुरक्यामुळे पार दिसेनाशा होतात. समस्या नुसती सकाळच्या धुरक्यापुरती मर्यादित नाही. मुंबईतील सरकारी व खासगी रुग्णालयांमध्ये श्वसनाच्या तक्रारी घेऊन येणाऱ्या रुग्णांमध्ये सध्या मोठी वाढ दिसते आहे. गेले दोन आठवडे मुंबईत रुग्णालयांतील जवळपास निम्मे रुग्ण हे दीर्घकाळ टिकणारा कफ, सर्दी, घसादुखी व श्वसनाच्या तक्रारी घेऊन येत आहेत. मुंबईतील हवेचे प्रदूषण हे प्रामुख्याने वाढत्या बांधकामांमुळे व पावसाळ्यानंतर वाढलेल्या धुळीमुळे आहे याकडे तज्ज्ञ लक्ष वेधतात. वेळेत उपचार न घेतल्यामुळे रुग्णांमधील लक्षणे तीव्र होतात असे डॉक्टर सांगतात. प्रदूषणाशी निगडित आरोग्य समस्यांमध्ये वाढ झाल्याचे आरोग्यविमा कंपन्यांकडील आकडेवारीवरूनही दिसून येते. रुग्णालयांत दाखल कराव्या लागलेल्या रुग्णांच्या विम्यासाठीच्या दाव्यांपैकी आठ टक्क्यांहून अधिक दावे प्रदूषणाशी निगडित आरोग्यसमस्यांचे असल्याचे दिसते. त्यामुळेच मुंबई महापालिकेनेही या संदर्भात कठोर पावले उचलण्याचे ठरवले आहे. मुंबई शहरात हवेचा निर्देशांक सलग तीन दिवस २००च्या वर राहिल्यास आणि उपनगरांत ३००च्या वर राहिल्यास तेथील सर्व बांधकामे थांबवली जातील असा इशारा मुंबई महापालिका प्रशासनाने दिला आहे. गेली दोन वर्षे पालिकेकडून हवेचा दर्जा चांगला राखण्यासाठी पाण्याची फवारणी, रस्त्यांवरील धूळ नियंत्रित करणे आदी उपाययोजना सातत्याने केल्या जात आहेत, परंतु तरीही ही समस्या आटोक्यात येत नसल्याने कठोर पावले उचलावी लागतील असे दिसते. महानगरांना भेडसावणाऱ्या प्रदूषणाची चर्चा नेहमीच होत असते. पण सध्या देशभरातील ४४७ जिल्ह्यांमध्ये हवेतील पीएम-२.५चे प्रमाण सामान्यपेक्षा अधिक असल्याचे आढळून आले आहे. प्रदूषण मोजताना पीएम-२.५ हा घटक महत्त्वाचा ठरतो. देशात पीएम-२.५चे प्रमाण दिल्लीत सर्वाधिक आहे तर दुसऱ्या क्रमांकावर नजीकचेच चंदीगड शहर आहे. दिल्लीतील पीएम-२.५चे प्रमाण भारतीय मानकांच्या अडीच पट तर जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या तब्बल वीस पट आहे. ही आकडेवारी तेथील प्रदूषणाची समस्या किती गंभीर स्वरूपाची आहे हेच अधोरेखित करते. सरकारच्या प्रदूषणविरोधी उपाययोजनांना नागरिकांनीही हातभार लावल्याखेरीज ही समस्या आटोक्यात येणार नाही.**

# निरोगी जीवनासाठी शुद्ध पर्यावरण काळाची गरज

पर्यावरण हा जीवनाचा आधार आहे, जर पर्यावरण सुरक्षित असेल तरच समस्त सजीवांचे संवर्धन शक्य आहे. आपल्या सभोवतालच्या वातावरणात आवश्यक घटकांची उपस्थिती ही पर्यावरणाचा एक अमूल्य भाग आहे, जसे की हवा, पाणी, सूर्यप्रकाश, पर्वत, नद्या, समुद्र, जंगले, झाडे, वनस्पती, प्राणी, पक्षी, जमीन, आकाश, धातू, खनिजे, हिमखंड आणि इतर एकत्रितपणे पर्यावरणात महत्त्वाची भूमिका बजावतात आणि पृथ्वीवर जीवन शक्य करतात. हे घटक एकमेकांना पूरक आहेत आणि आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूवर परिणाम करतात. पर्यावरण आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे; त्याचे रक्षण करणे म्हणजे मानवी जीवनाचे रक्षण करणे. तथापि, निष्काळजीपणा, दूरदृष्टीचा अभाव आणि स्वार्थामुळे, आपले पर्यावरण वेगाने नष्ट झाले आहे. परिणामी, प्राणघातक आजारांचा प्रसार झपाट्याने झाला आणि अकाली मृत्यूचे प्रमाण नाटकीयरित्या वाढले आहे.



आजार आता वयावर आधारित नाहीत, तर प्रदूषण आणि खराब जीवनशैलीवर आधारित आहेत. आज देशात निरोगी, आनंदाने आणि शांततेने जगण्यासाठी शुद्ध हवा, पाणी, पौष्टिक अन्न आणि आल्हाददायक वातावरण मिळणे दुर्मिळ होत चालले आहे. या समस्येबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि पर्यावरणाला वाचवण्यासाठी दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी जगभरात जागतिक पर्यावरण संरक्षण दिन साजरा केला जातो.

आपल्या देशात पाश्चात्य देशांपेक्षा प्रदूषण, निष्काळजीपणा, बेजबाबदारपणा, जागरूकतेची कमी, गुन्हेगारी, स्वार्थ आणि सहन करण्याची सवय खूप जास्त आहे. आपल्या सभोवतालचे छोटे देशही पर्यावरण संरक्षणात आपल्यापेक्षा पुढे आहेत. उदाहरणार्थ, भूतान आपले नैसर्गिक सौंदर्य जपून पुढे जात आहे, जे त्याच्या नागरिकांच्या आरोग्यात देखील दिसून येते. विकसित देशांमध्ये पर्यावरणाचे नुकसान रोखण्यासाठी कठोर नियम आणि कायदे काटेकोरपणे अंमलात आणले जातात. तेथील सरकार पर्यावरण संरक्षणाबाबत कठोर दृष्टिकोन बाळगते आणि जनतेची गैरसोय होऊ नये यासाठी विशेष काळजी घेतली जाते आणि विविध संभाव्य पर्यायांची अंमलबजावणी केली जाते. अशा वातावरणात पर्यावरण आणि आरोग्य सुधारण्यासाठी सरकारच्या प्रयत्नांना जनता पूर्णपणे पाठिंबा देते. या तुलनेत आपण अजूनही मागे असल्याचे दिसून येते. स्वच्छ पर्यावरण हे जीवनासाठी सर्वात आवश्यक आहे. तरीही आपण अजूनही पर्यावरणाचा नाश करण्यास नेहमी तयार असतो. अनेकदा असे दिसून येते की जागरूकता केवळ खास दिवसांवर आणि दिखाव्यासाठी केली जाते.

आपल्या शहरांमधून वाहणाऱ्या नद्या अधिकाधिक नाल्यांसारख्या झाल्या आहेत. पर्यावरणाचा झपाट्याने नाश होत आहे. स्विस कंपनी आयक्यूएअरने प्रसिद्ध केलेल्या जागतिक वायु गुणवत्ता अहवाल २०२४मध्ये भारताला जगातील पाचव्या क्रमांकाचा सर्वाधिक प्रदूषित देश म्हणून स्थान देण्यात आले. दिल्ली ही जगातील सर्वात प्रदूषित राजधानी आहे. जगातील १० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी सहा आणि टॉप २०पैकी १३ शहरे भारतात आहेत. अलिकडच्या अभ्यासानुसार भारतात दरवर्षी १७ लाख ते २० लाख लोक वायू प्रदूषणामुळे मृत्युमुखी पडतात. स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०२५च्या अहवालात २०२३मध्ये अंदाजे २० लाख मृत्यूंचा अंदाज आहे आणि २०२२च्या लॅन्सेट अहवालात १७ लाखांहून अधिक मृत्यूंचा अंदाज आहे. बाहेरील आणि घरातील वायू प्रदूषणामुळे हृदयरोग, स्ट्रोक आणि सीओपीडी सारख्या असंसर्गजन्य आजारांमुळे मृत्यू होतात. त्याचप्रमाणे, जल प्रदूषण, प्लास्टिक प्रदूषण, मातीचे प्रदूषण आणि अस्वच्छ परिस्थितीमुळे मोठ्या संख्येने अकाली निष्पाप लोकांचा मृत्यू होतो. शिवाय, अनेक आजार शरीर आणि मनावर तसेच जीवनाच्या प्रत्येक पैलूवर गंभीर परिणाम करतात. किरणोत्सर्गी प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, औष्णिक प्रदूषण आणि प्रकाश प्रदूषण आपल्याला मृत्यूच्या तावडीत ढकलतात.

आपल्या देशातील लोक जागरूक होईपर्यंत या व्यवस्था सुधारणार नाहीत. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आपण स्वार्थ आणि लोभ सोडून जीवनाचे मूल्य समजून घेतले पाहिजे. अन्नधान्यांसाठी हानिकारक रसायनांचा वापर बंद करणे आणि सेंद्रिय शेतीचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे. आपण दररोज आपल्या आजूबाजूला अशा घटना पाहतो ज्या पर्यावरण आणि आरोग्य व्यवस्थांना हानी पोहचवतात, परंतु बहुतेक लोक अशा समस्या सोडवण्यासाठी आपले कर्तव्य पार पाडण्याचा प्रयत्नही करत नाहीत. गरज, मागणी आणि विकासाच्या नावाखाली, शहरांमधून जमीन झपाट्याने गायब होत असून तिचे सिमेंटमध्ये रूपांतर होत आहे. झाडं वाढीसाठी पुरेशी माती नसल्याने शहरांमध्ये झाडे कमी होत आहेत. पावसाळ्यात मंद वाऱ्यानेदेखील उरलेली झाडे मुळापासून उन्मळून रस्त्यावर पडतात. शहरांमध्ये पावसाचे पाणी शोषून घेण्यासाठी जमीन नाही. तापमान सतत वाढत आहे, ऋतूचक्र विस्कळीत होत आहे, ज्यामुळे पिकांचे सतत नुकसान होते आणि मानवी शरीर कमकुवत होत आहे.

आपण अनेकदा रस्त्यांवर नळाचे पाणी वाहताना पाहतो, दिवसा रस्त्यावर दिवे चालू असतात, लोक निर्भयपणे रस्त्याच्या कडेला कचरा टाकतात, घाण करतात, ते उघड्यावर कचरा जाळतात आणि रस्त्यावर थुंकतात. बंदी घातलेल्या प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो, कारखान्यांमधून निघणारे विषारी रासायनिक पाणी उघड्यावर किंवा शेतात सोडले जाते, नद्यांमध्ये कचरा टाकला जातो, जैववैद्यकीय कचरा आणि यांत्रिक कचरा योग्यरित्या विल्हेवाट लावला जात नाही, मर्यादित नैसर्गिक संसाधने आणि इंधनाचा अतिरेकी वापर पर्यावरण आणि संपूर्ण जीवसृष्टीला धोका निर्माण करत आहे. अस्वच्छ परिस्थितीमुळे रोगांचा प्रसार वाढत आहे. कचऱ्याच्या पुनर्वापराच्या व्यवस्थेला योग्यरीत्या वेग मिळत नाही आहे. भेसळ अव्याहतपणे सुरू आहे आणि बहुतेक वस्त्या आणि सार्वजनिक जागा घाणेरड्या राहतात, विशेषतः पावसाळ्यात खूप वाईट परिस्थिती होते. लोकांना त्यांच्या अंगणात झाडांऐवजी अधिक खोल्या हव्या आहेत आणि अतिक्रमणे स्पष्टपणे दिसून येतात.

पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि आपले आरोग्य राखण्यासाठी, आपण शक्य तितके चालणे, सायकल चालवणे किंवा सार्वजनिक वाहतुकीचा वापर करून आपला कार्बन फूटप्रिंट कमी करू शकतो. घरे आणि संस्थांमध्ये हरित ऊर्जेचा वापर करा; रिसायकलद्वारे वस्तूंचा पुनर्वापर करा. प्लास्टिकला पर्याय शोधा, एकदाच वापरता येणारे प्लास्टिक टाळा. अन्न कचरा फेकून देण्याऐवजी, ते कंपोस्ट करा आणि शाश्वत स्रोतांपासून बनवलेल्या उत्पादनांचा वापर करा, पर्यावरणपूरक स्वच्छता उत्पादने वापरा, स्वच्छता सहभाग वाढवा आणि अधिक झाडे लावा.

आपल्या अमर्याद इच्छा आणि गरजा पूर्ण करण्यासाठी, मानव पर्यावरणाचे रक्षण करण्याऐवजी त्याचे शोषण करत आहे. मानवांपेक्षा प्राणी, पक्षी, कीटक जीव चांगले आहेत, जे निसर्गाचे रक्षण करण्यात अमूल्य भूमिका बजावतात. आपण आपला आळस आणि स्वार्थ सोडून पर्यावरणाचे रक्षण करण्याची आणि स्वतःच्या सुरक्षिततेची आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. जर हे सुंदर, स्वच्छ आणि अनुकूल वातावरण टिकले तरच आपण पृथ्वीवर आरामात जगू शकू. हे सत्य प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे. निसर्ग आपल्याला नेहमीच निःस्वार्थपणे देतो, त्याचप्रमाणे त्याची काळजी घेणे देखील आवश्यक आहे. पैशाने आपण श्वास विकत घेऊ शकत नाहीत; सर्व जीवांना जीवनाची आवश्यक संसाधने निसर्ग स्वतः पुरवतो. मानवांनी पर्यावरणाशी छेडछाड करण्यापासून दूर राहावे, नाहीतर निसर्ग आपला विनाशकारी प्रकोप प्रकट करेल.

प्रत्येक मानव, प्राणी आणि सजीवांना निसर्गाद्वारे सहज उपलब्ध असलेल्या गोष्टींवर समान अधिकार आहेत, जसे की शुद्ध हवा, पाणी, सूर्यप्रकाश, पौष्टिक अन्न, झाडे, वनस्पती आणि हिरवळ. हे प्रदूषित करायचे नाही, तर त्यांचे संरक्षण करायचे आहे.

**डॉ. प्रीतम भी. गेडाम**



## बदलते तंत्रज्ञान

# बेडवर लॅपटॉप चालवताय? बसू शकतो हजारोंचा फटका!

आजच्या युगात लॅपटॉप हा आपल्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा भाग बनला आहे. काम असो, शिक्षण, गेमिंग किंवा मनोरंजन... लॅपटॉपशिवाय पान हालत नाही, मात्र अनेक जण सोयीसाठी जी एक चूक करतात, ती त्यांच्या महागड्या डिव्हाईससाठी मोठे संकट ठरते. तुम्हालाही बेडवर किंवा उशीवर लॅपटॉप ठेवून काम करण्याची सवय असेल तर वेळीच सावध व्हा. या सवयीमुळे तुमच्या लॅपटॉपचा मदरबोर्ड जळू शकतो आणि दुरुस्तीचा खर्च तुमच्या खिशाला मोठी कात्री लावू शकतो.




काही गंभीर चुका तुमच्या लॅपटॉपचे आयुष्य कसे कमी करतात. प्रत्येक लॅपटॉपमध्ये गरम हवा बाहेर फेकण्यासाठी खालील बाजूस 'एयर वेंट' दिलेले असतात. तुम्ही जेव्हा बेड, सोफा किंवा ब्लँकेटसारख्या मऊ पृष्ठभागावर लॅपटॉप ठेवता, तेव्हा हे वेंट पूर्णपणे ब्लॉक होतात. गरम हवा बाहेर न पडल्याने लॅपटॉप पटकन गरम होतो. यामुळे चिपसेट आणि महत्त्वाचे मदरबोर्डवर प्रचंड ताण येतो, ज्यामुळे ते जळण्याची शक्यता वाढते आणि डिव्हाईसचा परफॉर्मन्सही कमी होतो.

जेव्हा हवा खेळती राहत नाही, तेव्हा लॅपटॉपला थंड ठेवण्यासाठी 'कूलिंग फॅन' अधिक वेगाने फिरू लागतो. यामुळे फॅन लवकर खराब होतो आणि सिस्टम वारंवार स्लो होते किंवा लॅग होते. जास्त वेळ असा वापर केल्यास फॅन आणि मदरबोर्ड दोन्हीचे नुकसान होते.

बेडशीट, उशी किंवा ब्लँकेटमधील बारीक धूळ आणि तंतू लॅपटॉपच्या आत जातात. ही धूळ फॅन, RAM स्लॉट, थर्मल पेस्ट आणि मदरबोर्डवर जमा होते. यामुळे हळूहळू सर्किटरी प्रभावित होते आणि लॅपटॉप वारंवार हँग होतो किंवा अचानक बंद पडतो.

बेडवर काम करताना अनेकदा स्क्रीनचा अँगल योग्य नसतो. कालांतराने डिस्प्लेवर दाब वाढतो आणि हिंज ढिले होतात. यामुळे डिस्प्लेवर लाईन्स पडणे, स्क्रीन तुटणे किंवा हिंज दुरुस्त करण्यासाठी हजारो रुपये खर्च करावे लागतात. मऊ पृष्ठभागावर लॅपटॉप अस्थिर असतो. किंचित हालचाल झाली तरी लॅपटॉप खाली पडून मोठा डॅमेज होऊ शकतो तसेच बेडवर चहा, कॉफी किंवा पाण्याची बाटली जवळ असल्यास, लिक्विड सांडून मदरबोर्ड 'शॉर्ट' होण्याची शक्यता सर्वाधिक असते. म्हणूनच काळजी घ्या.

# ज्येष्ठ लेखक दि.बा. मोकाशी



## निमित्त

मराठी नवकथेत मोलाची भर घालणारे ज्येष्ठ लेखक दिगंबर बाळकृष्ण मोकाशी उर्फ दि.बा. मोकाशी यांचा जन्म २७ नोव्हेंबर १९१५ उरण येथे झाला. दि.बा. मोकाशी हे विसाव्या शतकातल्या श्रेष्ठ मराठी लेखकांपैकी एक होते. मराठी नवकथेत मोलाची भर घालणाऱ्या प्रारंभीच्या आघाडीच्या कथाकारांत त्यांची गणना होते. दि.बा. मोकाशी हे १९४०नंतर नवकथेत झळकणारे महत्त्वाचे नाव. तीन कादंबऱ्या, तीन ललित व प्रवासवर्णनपर लेखसंग्रह, सात कथासंग्रह आणि पाच बालवाङ्मयपर पुस्तके असा त्यांचा भरगच्च साहित्यसंभार आहे.

लामणदिवा हा १९४७ साली प्रसिध्द झालेला मोकाशी यांचा हा पहिलाच कथासंग्रह. रोजच्या जीवनातल्या साध्यासुध्या प्रसंगांतून आकारणारी लेखकाची कथा सौम्य आणि संयत प्रकृतीची आहे. या पुस्तकात प्रारंभी 'पहिली पावले' या शीर्षकाखाली त्यांनी आपल्या लेखनाच्या सुरुवातीच्या कालखंडाविषयी लिहिले आहे. तेही कथेइतकेच रंजक आहे. माणूस साप्ताहिकात ७९-८०च्या कालखंडात प्रसिद्ध झालेले, 'संध्याकाळचे पुणे' हे पुण्यातील सांस्कृतिक हालचालींचे दर्शन घडवणारे लेख चांगलेच गाजले. पुण्यात रोज घडणाऱ्या उपक्रमांबद्दल, व्यक्तींबद्दल आणी संस्थांबद्दल अत्यंत रसिकतेने लिहिलेले हे लेख आहेत. प्रसन्नता आणि निर्व्याजता, चिंतनशीलता आणि ताजेपणा ही मोकाशी यांच्या साहित्यातील वैशिष्ट्ये या लेखांमध्ये आढळतील. 'आम्ही मराठी माणसं' हा १३ वैशिष्ट्यपूर्ण कथांचा संग्रह त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशित झाला. आपल्या अवतीभवतीच्या माणसांचे नितळ विश्व सरळ साध्या पध्दतीने उभे करावे, ते नाट्यपूर्ण आणि शैलीदार पध्दतीने मांडण्यात त्यामागच्या वास्तवाची हानी होते, असे त्यांना वाटे. या संग्रहातील हलक्या-फुलक्या कथा सामान्यांच्या सुप्तासुप्त भावनांचे खेळकर भूमिकेतून चित्र रेखाटणाऱ्या आहेत. त्यांच्या निधनानंतर साहित्य अकादमीने १९८८मध्ये 'दि.बा. मोकाशी यांची कथा' (निवडक कथांचा संग्रह) हे पुस्तक प्रसिद्ध केले. त्याच्या प्रस्तावनेत मोकाशींच्या इतर साहित्याचा परामर्श घेताना 'कामसूत्रकार वात्स्यायन' या कादंबरीचा मात्र उल्लेख नाही. मुंबई विद्यापीठातील मराठी विभागाच्या प्रमुख प्रा. सरोजिनी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली माधुरी पणशीकर यांनी मोकाशी यांच्या साहित्यावर प्रबंध लिहून डॉक्टरेट घेतली. दि.बा. मोकाशी यांनी लामणदिवा, वणवा मिळून ११ कथासंग्रह, देव चालले, आनंद ओवरी या कादंबऱ्या, तसेच पालखी, अठरा लक्ष पावलं अशी प्रवासवर्णने, संध्याकाळचे पुणे (ललित), रेडिओदुरुस्ती व्यवसाया-बद्दलचे पुस्तक व बालसाहित्यदेखील त्यांनी लिहिले.

'अठरा लक्ष पावलं'मध्ये त्यांनी प्रवासवर्णनातून समाजजीवनाचा शोध घेतला. त्यांच्या 'आनंद ओवरी' या संत तुकारामांच्या जीवनावरील कादंबरीचे अमेरिकन अभ्यासक जेफ ब्रेकेट यांनी इंग्रजीत भाषांतर करून ते 'ट्विटर'वर ठेवले आहे. त्यांच्या इतरही अनेक पुस्तकांची हिंदी व इंग्रजी भाषांतरे झाली आहेत. त्यांच्या 'पालखी' या पुस्तकातून पंढरीच्या वारीवर विपुल लेखन केलंय. 'कामसूत्रकार वात्स्यायन' ही त्यांची १९७८मध्ये प्रकाशित झालेली चरित्रात्मक कादंबरी. त्यांच्या या कादंबरीची मात्र फारशी दखल घेतली गेली नाही. जानेवारी २०१४मध्ये त्यांची कन्या ज्योती कानेटकर यांनी या पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर अमेझॉनवर टाकले आहे. दि.बा. मोकाशी यांचे २९ जून १९८१ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

# ताजेतवाने करणारे इफर्व्हेसंट ड्रिंक

आजच्या जलदगतीच्या जीवनशैलीत आपला दिवस सूर्य उगवण्याआधीच सुरू होतो आणि रात्री उशिरापर्यंत संपत नाही. नोकरी, कुटुंब आणि वैयक्तिक ध्येय यामधील संतुलन राखताना दिवसभर लक्ष केंद्रित ठेवणे आणि उत्साही राहणे अत्यावश्यक झाले आहे. त्यामुळे लोक आता ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी आणि एकाग्र राहण्यासाठी अधिक स्मार्ट पर्याय शोधत आहेत.




या बदलती जीवनशैली ओळखून भारतातील अग्रगण्य आरोग्य आणि वेलनेस कंपनी हर्बालाइफ इंडिया घेऊन आली आहे लिफ्ट ऑफ® एक ताजेतवाने करणारे इफर्व्हेसंट ड्रिंक, ज्यात आहे कॅफीन, जे तुम्हाला सतर्क व ऊर्जावान ठेवते आणि यात आहे झीरो ॲडेड शुगर. हे स्वादिष्ट कलिंगड (वॉटरमेलन) फ्लेव्हरमध्ये उपलब्ध असून सक्रिय आणि संतुलित जीवनशैली जगणाऱ्यांसाठी तयार करण्यात आले आहे.

भारतभर आता अशा फंक्शनल न्यूट्रिशन फॉरमॅट्सची मागणी वाढत आहे जी व्यस्त दिनचर्येत सहज बसतात - नेण्यास सोयीस्कर, पटकन तयार होणारे आणि आधुनिक आरोग्याच्या गरजेनुसार असलेले.

लिफ्ट ऑफएँ हेच देते - एक सोपी पावडर फॉरमॅट, जी छोट्या सॅशे पॅकमध्ये उपलब्ध आहे. फक्त एक सॅशे एका ग्लास पाण्यात टाका, ढवळा आणि प्या आणि लगेचच मिळवा ताजेपणा व ऊर्जा.

ही लाँचिंग हर्बालाइफच्या विज्ञानावर आधारित पोषणाच्या दृष्टिकोनाचे प्रतीक आहे, जी आजच्या गतिशील, सक्रिय जीवनशैलीशी जुळते. लिफ्ट ऑफ®च्या माध्यमातून कंपनीने भारतातील न्यूट्रास्युटिकल पेय क्षेत्रात आपली उपस्थिती अधिक मजबूत केली आहे, अशा ग्राहकांसाठी जे दिवसातून एकाग्र आणि उत्साही राहू इच्छितात.

लिफ्ट ऑफ®मध्ये असलेले कॅफीन ऊर्जा देण्यास, लक्ष केंद्रित ठेवण्यास आणि तात्पुरते मेटाबॉलिझम वाढविण्यास मदत करते. यात असलेले अल्पिनिया गलांगा हे अर्क मानसिक सतर्कता आणि शांततेची भावना वाढविण्यास सहाय्यक असल्याचे दाखवले गेले आहे. याशिवाय यात आहे व्हिटॅमिन उ आणि इ व्हिटॅमिन्सचा समूह (इ१, इ२, इ३, इ५, इ६, इ७, इ१२), जे शरीरातील ऊर्जानिर्मितीत महत्त्वाचे योगदान देतात आणि जागरूकता टिकवून ठेवतात. हे सर्व घटक हर्बालाइफच्या पुराव्यावर आधारित दृष्टिकोनाचे दर्शन घडवतात, जे सतत बदलणाऱ्या ग्राहकांच्या गरजेनुसार विकसित होत आहेत.

# नागाव ते आक्षी बीच पर्यटन विकासासाठी ३०० कोटींचा निधी

## आमदार महेंद्र दळवी यांनी दिली माहिती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नागाव ते आक्षी बीच पर्यटन विकासासाठी ३०० कोटी निधीची मंजूरी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विकास विभाग अंतर्गत मंजूर झाल्याची माहिती आमदार महेंद दळवी यांनी नागाव ग्रामपंचायतीच्या सामाजीक सभागृहात दिली. या वेळी नागाव ते आक्षी बीच पर्यटन विकासाचे डेमो संकल्पना चित्रफीतीद्वारे उपस्थित ग्रामस्थांना दाखविण्यात आले.

नागाव ग्रामपंचायतीच्या सामाजीक सभागृहात नागाव ते आक्षी बीच पर्यटन विकास डेमो संकल्पना चित्रफितीव्दारे दाखविण्याचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या वेळी आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रमुख उपस्थितीसह उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, प्रांत अधिकारी मुकेश चव्हाण, उपमुख्यकार्यकारी अधिकारी राजिप ग्रा.प. राहूल तनपुरे, जिल्हा ग्रामीण यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य व्दारकानाथ नाईक, शिवसेना अलिबाग तालुका प्रमुख अनंत गोंधळी, शिवसेना तालुका खजिनदार सुरेश म्हात्रे, जिल्हा नियोजन समिती सदस्य संतोष निगडे, सचिन राउळ, यांच्या



प्रमुख उपस्थितीसह नागाव ग्रा.प.सरपंच हर्षदा मयेकर, उपसरपंच सुरेंद्र नागलेकर, ग्रा.प.अधिकारी श्वेता संजय कदम, ग्रा.प.सदस्य निखिल मयेकर, आदेश मोरे, ग्रा.प. सदस्या अंकिता चेतन शेवडे, मंगळा रविद्र नागे, निकिता नितिन पाडेकर,विणा विकास पिंपळे,प्रियंका प्रदिप काटे, सुप्रिया संजय म्हात्रे, विणा जयदीप भगत आदी मान्यवरासह मोठया संख्येने नागाव ग्रामस्थ व महिला यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुरूवातीस नागाव ग्रामपंचायतीचे वतीने आमदार महेंद दळवी व उपस्थित शासकीय अधिकारी यांचे स्वागत पुष्पगूच्छ प्रदान करून सरपंच हर्षदा मयेकर यांनी केले. त्यानंतर नागाव ग्रामपंचायतीच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी प्रास्ताविकेत कार्यक्रमाची माहिती दिली. नागाव ते आक्षी बीच पर्यटन विकासासाठी ३०० कोटी निधीची मंजूरी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विकास विभाग अंतर्गत मंजूर झाल्याची माहिती आमदार महेंद दळवी यांनी नागाव ग्रामस्थांना दिली. नागाव ते आक्षी बीच पर्यटन विकासासाठी महाराष्ट्र शासनाचा ३०० कोटीचा पर्यटन विकास निधी आमदार महेंद्र दळवी यांच्या पाठपुराव्याने व प्रयत्नाने उपलब्ध झाला असल्याची माहिती देण्यात आली.

# श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयासाठी प्रयत्न करणार –मंत्री गोगावले

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हरिहरेश्वर येथे देवदर्शनासाठी गेलेल्या राज्याचे कॅबिनेट मंत्री भरत गोगावले यांनी दर्शनानंतर जिवनेश्वर मंदिर परिसरात आयोजित सभेत उपस्थित जनतेशी संवाद साधत श्रीवर्धन तालुक्याच्या अत्यावश्यक प्रश्नांवर भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले कि, हरिहरेश्वर येथे फक्त देवदर्शनासाठी आलो होतो. दर्शन घेऊन जिवनेश्वर येथे लोकांशी संवाद साधताना, श्रीवर्धनच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका मांडतो–हा दर्जा मिळवून न्याय देणे हे माझे प्राधान्याचे काम आहे.

भरत गोगावले म्हणाले, हृदयविकारासारख्या आपत्कालीन परिस्थितीत श्रीवर्धनहून माणगाव, अलिबाग, पनवेल किंवा मुंबई गाठायला लागणारे ४–५ तास अनेकांना परवडत नाहीत. उपचार उशिरा मिळाल्याने जीविताला धोका निर्माण होतो. हा ताण कमी करणे शासनाचे जबाबदारीचे काम आहे. उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळाल्यानंतर स्थानिकांना आयसीयू, तातडीची सुविधा, आधुनिक यंत्रणा येथेच मिळू शकतील, असे त्यांनी सांगितले.



सभेत त्यांनी प्रतिस्पर्ध्यांकडे कोणत्याही व्यक्तीचा उल्लेख न करता आवाहन केले केवळ टीका करण्यापेक्षा, आतापर्यंत कोणती कामे केली याची जनतेसमोर स्पष्ट मांडणी करा. विकासकामांची पारदर्शक चौकशी आम्ही करणार असून, जनतेसमोर सर्व तथ्ये ठेवणार आहोत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महिलांसाठी राबविलेल्या एसटी मोफत प्रवास सेवा, 'लाडकी बहिण योजना' या उपक्रमांचीही त्यांनी माहिती दिली. सभेत धार्मिक–ऐतिहासिक संदर्भ देताना त्यांनी सांगितले, तीर्थयात्रा करता तेव्हा रायगडलाही नक्की या. शिवरायांचे स्मरण मनाला बळ आणि दिशा देते.

जिवनेश्वर मंदिराजवळ झालेल्या या सभेला प्रमोद घोसाळकर, वसंत यादव, अविनाश कोळंबेकर, राजू चव्हाण, देवेंद्र भुसाणे, सावन तवसाळकर, १९ नगरसेवक उमेदवार, एक नगराध्यक्ष उमेदवार, तसेच शेकडो शिवसैनिकांची उपस्थिती होती.

जिवनेश्वर येथे झालेल्या संवादातून मंत्री भरत गोगावले यांनी आरोग्य, रस्ते, जलप्रकल्प, जीवना बंदर (जेठी) आणि इतर मूलभूत विषयांवर काम करण्यासाठी ठोस आणि नियमानुसार भूमिका मांडली.

उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळवण्यासाठीची त्यांची हमी, पारदर्शकता, आणि महिलांसाठीच्या योजनांवरील बांधिलकी–हे सर्व मुद्दे सभेला जबाबदार, संतुलित आणि कायदेशीर चौकटीत वजनदार ठरवणारे होते.

## अलिबागमध्ये संविधान जागर यात्रा



**अलिबाग : प्रतिनिधी**

संविधानदिनाचे औचित्य साधून संविधान जागर समिती, अलिबागतर्फे बुधवारी (दि. २६) अलिबाग शहरात संविधान जागर यात्रा काढण्यात आली. अलिबाग शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून संविधान जागर यात्रेला प्रारंभ करण्यात आला. हिराकोट तलाव येथे यात्रेची संगता करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे श्रावणी मगर हिने वचन केले. अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे नितीनकुमार राऊत यांनी या वेळी आपले मनोगत व्यक्त केले. ॲड. अंकित बंगेरा, ॲड. जे. टी. पाटील, सुषमा पाटील, सहयोग नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष योगेश मगर, क्रांती आघाडीचे अध्यक्ष बी. जी. पाटील, दीपक निकोते, जिल्हा सचिव किशोर पाटील, जिल्हा महाला प्रमुख श्रद्धा पाटील, अलिबाग तालुका महिला अध्यक्षा वंदना दिलीप पाटील, पनवेल तालुका अध्यक्ष संदीप काशीद हरिश्चंद्र भोईर, मनोहर पाटील, दीपक निकोते, आर. बी. पाटील, ॲड. अंकित बंगेरा, सुषमा पाटील, लक्ष्मण पाटील , दत्ताराम मोहिते, अनिल गायकवाड आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून संविधान जागर यात्रेला सुरुवात करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. एसटी स्टँड, बालाजी नाका, मारुती नाका, कर्वे रोड या मार्गे जाऊन जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील हिराकोट तलाव येथे यात्रची सांगता करण्यात आली. हिराकोट तलाव येथे झालेल्या सभेत ॲड. जे. टी. पाटील यांनी उपस्थिताना मर्गदर्शन केले.

## तळा येथे संविधान जनजागृती रॅली

**तळा : प्रतिनिधी**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला–वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा येथे २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. भारताच्या संविधानाबद्दल जागरूकता वाढावी, तरुण पिढीमध्ये लोकशाही मूल्यांची जपणूक व्हावी या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. तद्नंतर ईशा पांचाळ या विद्यार्थिनींनी संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन केले. यावेळी प्राध्यापक एन. सी. पाटील व प्राध्यापक पी. पी. कसबे यांनी विद्यार्थ्यांसमोर संविधानाचे महत्व विशद केले. त्यांनी संविधान निर्मितीची पार्श्वभूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान, तसेच नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाच्या वतीने भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. तळा कॉलेज, एस बी आय बँक, बाजारपेठ, बळीचा नाका ते परत महाविद्यालय असा मार्ग घेत विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत संविधान सन्मानाचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवला. रॅलीदरम्यान 'संविधानाचा सन्मान देशाचा अभिमान', लोकशाहीचे रक्षक आपण' अशा प्रभावी घोषणा देऊन विद्यार्थ्यांनी परिसरात जनजागृती घडवून आणली.

या रॅलीत शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पोलीस व विद्यार्थी सहभागी झाले होते. वातावरणात देशभक्तीचा आणि जागृतीचा उत्साह जाणवत आहे.


## पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**सार्वत्रिक निवडणूक – २०२५**
**प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीची सुधारीत सूचना**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक–२०२५ करिता मा. राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र.रानिआ/मनपा–२०२५/प्र.क्र. ४१/का–५ दि. २६ नोव्हेंबर, २०२५ ने प्रारुप मतदार यादी हरकती व सूचना मागवीणेकरीता सुधारीत वेळापत्रक प्राप्त झाले असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | दि.१३/११/२०२५ च्या पत्रानुसार निर्धारित केलेला दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि. २७/११/२०२५ | दि.०३/१२/२०२५ |
| २ | प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणीत करुन प्रसिध्द करणे. | दि.५/१२/२०२५ | दि.१०/१२/२०२५ |
| ३ | मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द करणे | दि.०८/१२/२०२५ | दि.१५/१२/२०२५ |
| ४ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | दि.१२/१२/२०२५ | दि.२२/१२/२०२५ |

**दिनांक :– २६/११/२०२५**

**सही/–**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**


# उसर परिसरात भरीव विकासकामांना गती

## आंबेपूर, आंदोशी, देवघर व वरंडे येथे नवे आरओ प्लांट कार्यान्वित



**रेवदंडा : प्रतिनिधी**

गेल (इंडिया) लिमिटेड कंपनी आपल्या कॉर्पोरेट पर्यावरण दायित्व (CER) उपक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील उसर आणि परिसरातील गावांमध्ये सामाजिक व पायाभूत विकासाची अनेक कामे राबवत आहे. पीडीएच–पीपी (प्रोपेन डिहायड्रोजेनेशन–पॉलीप्रोपायलीन) प्रकल्पाभोवतीच्या गावांच्या प्रगतीसाठी गेलने शाश्वत विकासावर भर देत विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

सीईआर योजनेंतर्गत करण्यात येणारी सर्व कामे स्थानिक ग्रामपंचायतींच्या माध्यमातून तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली केली जात आहेत. यात पिण्याचे पाण्यासाठी आरओ प्लांट, पाणी साठवणूक टाक्या, सौर पथदिवे, शाळा व अंगणवाड्यांचे सुशोभीकरण व डिजिटलायझेशन, तलावाचे बांधकाम, नवे बस स्टॉप, उंच प्रकाशस्तंभ (हायमास्ट लाईट) अशा तळागाळातील नागरिकांना अत्यावश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. गेल–उसर प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्रातील गावांसाठी आजवर १४.०२ कोटींच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी ३.७३ कोटींची कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे सुरू आहेत.

वरंडे ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या आंबेपूर, आंदोशी, देवघर आणि वरंडे या गावांसाठी एकूण ६०.३९ लाखांच्या कामांना मंजुरी मिळाली. त्यापैकी २.३६ लाखांचे हायमास्ट लाईट व नव्या बस स्टॉपचे काम पूर्ण, २८.०३ लाखांचे आरओ पिण्याच्या पाण्याचे प्रकल्प पूर्ण झाला आहे.

आंबेपूर कुंभारआळी, आंदोशी, वरंडे व देवघर येथे नव्याने स्थापित आरओ पिण्याचे पाणी प्रकल्पाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रभारी अधिकारी अनूप गुप्ता, मानव संसाधन विभागाचे महाप्रबंधक जितिन सक्सेना, इतर वरिष्ठ अधिकारी, वरंडे ग्रामपंचायतीचे सरपंच व सदस्य उपस्थित होते.



**खोपोली : नगर परिषद निवडणुकीत भाजप, शिवसेना व आरपीआय महायुतीचे थेट नगराध्यक्षपदाचे उमेदवार कुलदीपक रामदास शेंडे तसेच प्रभाग ५ मधून अनुसूचित जाती महिला अ मध्ये सोनिया मुकेश रुपवते व साधारण ब मध्ये इंदरमल खंडेलवाल उमेदवार आहेत. त्यांच्या प्रचारार्थ पनवेलमधील भाजप पदाधिकारी यात माजी नगराध्यक्ष सुनील घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, भाजप नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी नगरसेवक समीर ठाकूर, मोतीलाल कोळी, किशोर चौतमोल, भीमराव पवार, अभिलाषा ठाकूर, यमुना प्रकाशन, वरून डांगर, देवराम शार्दुल आदी उपस्थित होते.**


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने आमचे अशिल श्री. तुकाराम सखाराम निघूकर रा. कोयनावेळे, घोट कॅम्प, ता. पनवेल, जि रायगड यांचे मार्फत कळविण्यात येते की, मौजे कोयनावेळे ता. पनवेल, जि. रायगड येथे खालिल वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक | हिस्सा नं. | क्षेत्र | रू.पै. |
|---|---|---|---|---|
| कोयनावेळे | २३ | १ | ०.५७.७० <br> ०.०२.७० <br> ०.६०.४० | ४.७५ |

वरील मिळकती पैकी तळ्या लगतची मिळकत क्षेत्र ०.१६.०० गुंठे मिळकत ही आमचे अशिलांच्या ताबे कब्जा वहिवाटीत पिढयांनपिढ्या आहे. सदर मिळकती मध्ये आमच्या अशिलांचा पाया असून त्यावर घर देखील आहे. त्या ठिकाणी आमच्या अशिलांनी आंब्याची झाडे देखील लावलेली आहेत. तसेच आमचे अशिल सदर मिळकतीत शेती करीत असतात.

सदर मिळकतीवर १६ गुंठे क्षेत्रास १) दिलीप रामचंद्र कदम, २) सुजता रविंद्र कदम, ३) प्राजक्ता पांडूरंग मोरे यांच्या नावाची नोंद आहे. सदरची मिळकत आमचे अशिलांचे ताबे कब्जा वहिवाटीत आहे. दिलीप कदम वगैरे यांचे वरील मिळकतीस नाव असल्याचा फायदा घेवून ते सदर मिळकत अन्य इसमास विकू पाहत आहेत. त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. आमचे अशिलांनी त्यांना सदर मिळकतीचा व्यवहार जावेद पटेल अथवा अन्य कोणाशीही करू नये अश्या आशयाची आमचे मार्फत नोटीसही पाठविलेली आहे.

वर नमूद केल्या प्रमाणे सदर मिळकत ही आमचे अशिलांच्या ताबे कब्जा वहिवाटीत आहे. ती विक्री करण्याचा अथवा त्या मध्ये कोणाही इसमाचा कसल्याही प्रकारे हक्क अधिकार करण्याचा अधिकार दिलीप कदम वगैरे यांस नाही.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार दिलीप कदम वगैरे यांचे सोबत करू नये या उपरही वरील मिळकती बाबत कसल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही/तसेच तो बेकायदेशीर होईल. तसेच आमचे अशिल सदर १६ गुंठे मिळकतीचा ताबा देणार नाहीत याची नोंद घ्यावी

पनवेल,
दि. २६/११/२०२५

**सही/–**
**ॲड. प्रविण मधूकर ठाकूर**

गाळा नं. १, भाईजी अपार्टमेंट, सहस्त्रबुद्धे हॉस्पीटल समोर,
ता. पनवेल, जि. रायगड. मो ९८२२०४८३३८.



## पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | मे. तिरूपती इंटरप्रायजेस तर्फे भागीदार सागर रमेश पटेल.. प्लॉट नं. ए–९ + ए – १०, सेक्टर–०७, नवीन पनवेल (प). ता. पनवेल जि. रायगड. | ०१ नारळ व ०१ बदाम अशी एकूण ०२ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. ए– ९ + ए–१०, सेक्टर ०७, नवीन पनवेल (प), ता. पनवेल, जि. रायगड येथे प्लॉटच्या आवारातील ०१ नारळ झाड हे बांधकाम क्षेत्रात व फूटपाथवरील ०१ बदाम झाड हे वाहने आत बाहेर (ये जा) करणेस वाधित होत असुन, धोकादायक स्थितीत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**दिनांक :– २६/११/२०२५**
जा.क्र.– PMC-PARK/676/2025-PTAD

**सही/–**
**उपायुक्त**
**तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**



## पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

दुरध्वनी क्र. : ०२२–२७४५८०४०/४१/४२. फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३
अग्निशमनविभाग : २७४६१५०० ईमेल : panvelcorporation@gmail.com

| अनु.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | निविदा क्र./प.म.पा./अ. वि./२६२१/ प्र.क्र.१७/२१५५/२०२५ | पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागातील कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांना PPE किट खरेदी करणे कामी. |

**या ई–निविदेबाबतची विस्तृत माहिती शासनाच्या** http://mahatenders.gov.in **या संकेत स्थळावर** दि. २६/११/२०२५ ते दि. १०/१२/२०२५ रोजी **दुपारी ०३.०० वाजे पर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी.**

**सही/–**
**उप आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र :–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ६३२/६५३/२०२५**
**दिनांक :– २६/११/२०२५**

# २२ पोलीस ठाण्यांसह ११ विविध शाखांना आयएसओ मानांकन प्रमाणपत्र

**नवी मुंबई, पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलिसांच्या सेवांची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी आयुक्तालयाने मोठी झेप घेतली आहे. आयोजित गुन्हे आढावा बैठकीदरम्यान आयुक्त मिलिंद भारंबे यांनी परिक्षेत्रातील २२ पोलीस ठाणी आणि ११ विविध शाखांना आयएसओ मानांकनाचे प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित केले.

या मानांकनामागील मुख्य उद्दिष्ट म्हणजे नागरिकांना मिळणाऱ्या पोलीस सेवांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे निकष लागू करणे, कामकाज अधिक पारदर्शक बनवणे आणि प्रत्येक स्तरावर विश्वासार्हता वाढवणे. सर्व शाखांमध्ये काम वेळेत, नियमबद्ध पद्धतीने आणि उच्च कार्यक्षमतेने पूर्ण व्हावे, तसेच प्रत्येक प्रक्रियेसाठी ठोस मानक कार्यप्रणाली लागू करणे, हे आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे. या



मानांकनामागील मुख्य उद्दिष्ट म्हणजे नागरिकांना मिळणाऱ्या पोलीस सेवांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे निकष लागू करणे, कामकाज अधिक पारदर्शक बनवणे आणि प्रत्येक स्तरावर विश्वासार्हता वाढवणे. सर्व शाखांमध्ये काम वेळेत, नियमबद्ध पद्धतीने आणि उच्च कार्यक्षमतेने पूर्ण व्हावे, तसेच प्रत्येक प्रक्रियेसाठी ठोस मानक कार्यप्रणाली लागू करणे, हे आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे.

या प्रमाणित यादीत वाशी परिमंडळातील वाशी, एपीएमसी, रबाळे, कोपरखैरणे आणि रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. पनवेल परिमंडळात खारघर, तळोजा, कळंबोली, खांदेश्वर, कामोठे, पनवेल शहर आणि पनवेल तालुका पोलीस ठाण्यांना मानांकन मिळाले. तुर्भे परिमंडळातील तुर्भे एमआयडीसी, नेरूळ, एनआरआय, सीबीडी बेलापूर आणि सानपाडा पोलीस ठाणे यांचा समावेश आहे.

पोर्ट विभागात उरण, न्हावाशेवा, मोरा सागरी आणि उलवे पोलीस ठाण्यांना हे मानांकन देण्यात आले. त्याचबरोबर गुन्हे शाखा (मुख्यालय), विशेष शाखा, प्रशासन, डीसीपी ट्रॅफिक, सायबर सेल, पोलिस मुख्यालय, मोटार ट्रान्सपोर्ट विभाग आणि पुरावा व्यवस्थापन केंद्र (ईएमसी) यांनाही आयएसओ प्रमाणपत्र मिळाले.

# शिरवणेत संविधान रॅली उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

संविधान दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी नवी मुंबई आणि शिरवणे विद्यालय नेरूळ यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

शिरवणे विद्यालयातुन या संविधान रैलीची सुरुवात करण्यात आली असून शिरवणे तसेच नेरूळ प्रभागात संविधान रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, शिरवणे विद्यालयाच्या प्राचार्या भाग्यश्री चौधरी, शिक्षक तसेच शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी माध्यमांशी बोलताना डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले की,



२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या माध्यमातून आपलं संविधान लिहिलं गेलं. ते संविधान २६ जानेवारी १९५० पासून अंमलात आणायला सुरुवात झाली. २०१५ पासून संविधान दिन साजरा करण्याची संकल्पना सरकारने दिली आहे. संविधान हा लोकशाहीचा स्तंभ आहे, ज्यामुळे प्रत्येकाला हक्क व अधिकार मिळाले आहेत.

प्रत्येक विद्यार्थी, सामान्य नागरिकांपर्यंत संविधान दिन पोहचला पाहिजे. संविधानाचं महत्व कळलं पाहिजे. त्यासाठीच शाळेने आणि भाजपा नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याच अंतर्गत संविधान विषयक चित्रकला स्पर्धा, प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा घेण्यात येत आहेत.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात भारतीय संविधान दिन साजरा

**खारघर : प्रतिनिधी**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि.२६) राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अनुसूचित जाती-जमाती समितीतर्फे भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला होता.

या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच अनुसूचित जाती-जमाती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण केली व त्यानंतर उपस्थित विद्यार्थी, स्वयंसेवक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी राष्ट्रनिष्ठा, समता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूलभूत मूल्यांचा पुन्हा एकदा संकल्प करत



प्रास्ताविकेचे सामूहिक पठण केले.

या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्यांची जाणीव दृढ करण्याबरोबरच नागरिक म्हणून असलेल्या कर्तव्यांविषयी जागरूकता निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अनुसूचित जाती-जमाती समितीतील सदस्यांचे कौतुक केले व पुढील कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

# सीकेटी विद्यालयात संविधान दिनानिमित विविध उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील चांगु काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमिक विद्यालय येथे संविधान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यालयात विविध उपक्रम यशस्वी पणे राबविण्यात आले.



सकाळच्या प्रार्थनेसोबतच संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. संविधान दिनानिमित्त भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, त्यातील उत्कृष्ट भाषणांचे सादरीकरण इयत्ता आठवीतील १)निधी जगदीश पाटील आणि २) काव्या निलेश पवार यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाच्या शिक्षिका स्मिता भालेकर यांनी केली. तसेच शिक्षिका प्रगती जाधव यांनी संविधान दिन का साजरा करतात हे अधोरेखित करताना, हा दिवस साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश काय आहे, विद्यार्थ्यांची नेमकी कोणती भूमिका असावी याबद्दल माहिती सांगितली.

विद्यालयाच्या पर्यवेक्षिका नीरजा अदुरी यांनी संविधान आणि त्याची निर्मिती याबद्दल विचार सांगितले. विद्यार्थ्यांची विद्यालयाच्या आवारात प्रभात फेरी काढण्यात आली तसेच विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी शाळेच्या ग्रंथालयात भारतीय संविधान या पुस्तकांचे वाचन ही केले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी शिस्त आणि राष्ट्रनिष्ठा यांचे महत्त्व अधोरेखित केले. संपूर्ण कार्यक्रमाचे चित्रीकरण आणि छायाचित्रिकरण करण्यासाठी विद्यालयाच्या शिक्षिका स्नेहा पाटील यांनी विशेष सहकार्य केले.

कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडण्यासाठी सर्व शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी यांनी सहकार्य केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये संवैधानिक मूल्ये आणि एक जबाबदार नागरिकांची कर्तव्ये रुजवण्यास मदत झाली.

# बीसीटी लॉ कॉलेजमध्ये देशभक्तीपर कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनीमधील भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय, न्यू पनवेल येथे वंदे मातरम्च्या १५० व्या वर्षपूर्तीचे स्मरणोत्सव नुकताच झाला.

हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या कार्यवाह प्राचार्या डॉ. सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राष्ट्रीय दिन उत्सव समितीच्या संयोजिका सहाय्यक प्रा. डॉ. ममता भट्टाचार्य आणि सांस्कृतिक समितीच्या संयोजिका सहाय्यक प्रा. ऐश्वर्या पाटोळे यांच्या नियोजन व अंमलबजावणीत, मुंबई विद्यापीठाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाला राष्ट्रीय दिन उत्सव समिती व सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ. सत्यप्रकाश मिश्र, प्राचार्या डॉ. सानवी देशमुख, बी.ए. एल.एल.बी. समन्वयक सहाय्यक प्रा. धनश्री कदन मॅडम, तसेच प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सत्यप्रकाश मिश्र यांनी देशभक्तीविषयक प्रभावी भाषण केले. प्राचार्या डॉ. सानवी देशमुख यांनीही राष्ट्रीय गीताच्या मूल्यांचे कालातीत महत्त्व अधोरेखित केले. सूत्रसंचालन सहाय्यक प्रा. ऐश्वर्या पाटोळे मॅडम यांनी केले. समारोपात पायल घरत (प्रथम वर्ष बी.ए. एल.एल.बी.) हिने आभार मानले.



# एमएनएम विद्यालयात संविधान दिवस साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संविधान दिवस जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे साजरा करण्यात आला. संविधान दिनानिमित्त माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांच्या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी संविधानाच्या प्रस्तावनाचे स्पष्ट प्रकट वाचन केले.

संविधान दिनानिमित्त विशेष परिपाठाचे नियोजन करण्यात आले होते प्राथमिक विभागाच्या सहाय्यक शिक्षिका कविता शेवाळे यांनी भारतीय संविधान दिन साजरा करण्या बद्दलची



माहिती सांगितली. प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान दिनानिमित्त भाषणे तसेच भारतीय संविधानाने दिलेल्या हक्क आणि जबाबदाऱ्या याबद्दल छोटेखानी नाटिका सादर केली.

शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी संविधान दिवसाचे महत्त्व सांगताना विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानातील नागरिकांचे हक्क, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या तसेच संविधान निर्मिती प्रक्रियेची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली.

शाळेच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संविधान दिनाच्या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

# ‘विद्याभवन’ला साहित्य भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ शिक्षण संकुलासाठी लॉस एंजलिस येथील म्युझिक मॅटर प्रोजेक्ट या संस्थेच्या संस्थापिका मिशिका अस्वानी यांनी विविध १५ प्रकारचे संगीत वाद्य शालेय विद्यार्थ्यांना संगीताची आवड निर्माण होण्याकरिता सचिन गवळी, विद्या भवनच्या ज्येष्ठ शिक्षिका मीनल भोळे तसेच संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या माध्यमातून वस्तूरुप सहाय्य देणगी स्वरूपात देण्यात आली.

या वेळी गिटार, पियानो, हार्मोनियम, ढोल, ताशा, कच्छी, ढोलकी, बासरी, झांज, खंजेरी, खुळखुळा, टाळ, मृदंग, काठ्या व तबला इ. अशा स्वरूपामध्ये दर्जेदार संगीत वाद्ये विद्यार्थ्यांनी सुरमय सुरामध्ये वाजवून दाखविण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद घेतला. सचिन गवळी यांनी वाद्य वाजवणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या वेळी संस्थेचे कुलसचिव दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीजा नायर, मुख्याध्यापक गोरख कदम, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



# चिरनेर कातळपाडा येथे अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथे उभारण्यात आलेल्या दत्त मंदिरात ४ डिसेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या श्री दत्तजयंती उत्सवानिमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा अखंड हरिनाम सप्ताह ३० नोव्हेंबरपर्यंत श्री गुरुचरित्र ग्रंथ पारायण सोहळा भगवंताच्या अधिष्ठानाने, सद्गुरु माऊली हसुराम बाबा यांच्या कृपाशीर्वादाने, संतांच्या चिंतनाने आणि गुरुकुलाच्या सहकार्याने ह भ प गजानन महाराज, ह भ प चिदानंद महाराज, ह भ प मदन महाराज व दात्यांच्या सहकार्याने व्यासपीठ चालक ह भ प अनिल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असल्याची माहिती हभप दत्तात्रय महाराज यांनी दिली.

यामध्ये शनिवार २९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता दीपोत्सवाचा कार्यक्रम



मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. दरम्यान या अखंड हरिनाम सप्ताहात काकडा, वाचन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांबरोबर श्री सांप्रदाय नरेंद्र महाराज व सद्गुरु माऊली हसूराम बाबा यांच्या सांप्रदायाचे कार्यक्रम सुरू झाले आहेत. आश्लेषा केणी महाराज या दहा वर्षाच्या कीर्तनकार चिमुरडीने सोमवारी सादर केलेल्या कीर्तनातून भाविकांना मंत्रमुग्ध केले.

रविवार ३० नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता अनिल महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. अन्नदाते आणि देणगीदार या सर्वांचे अखंड सप्ताह मंडळाकडून आभार मानत आहेत. सद्गुरु माऊली हसुराम बाबा हरिपाठ मंडळ तसेच चिरनेर भोम यांच्यासह दत्त मंदिर कातळपाडा आजी माजी कमिटी, हरी स्मरण वारकरी संप्रदाय या सर्वांकडून अखंड हरिनाम सप्ताहाचे व्यवस्थापन केले जात असल्याची माहिती कातळपाडा ग्रामस्थांनी दिली.

# विद्यार्थ्यांसाठी बालकल्याण जनजागृती उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयात बालदिनाचे औचित्य साधत महिला व बालविकास विभाग, रायगड यांच्या सहयोगाने बालकल्याण जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम आदरणीय प्राचार्या डॉ. सांनवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला. विधी शाखेतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने या उपक्रमात सहभाग नोंदवला.

या सत्रात बालसंरक्षण, बालहक्क तसेच समाजाची बालकांच्या सुरक्षिततेतील जबाबदारी यावर विशेष भर देण्यात



आला. विद्यार्थ्यांनी जिल्हा महिला व बालविकास (CWC) विभागातील अधिकाऱ्यांसोबत तसेच बालकल्याण समितीच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. या अनुभवातून त्यांना कायदेशीर प्रक्रिया, बालकल्याण यंत्रणा आणि संकटात सापडलेल्या बालकांच्या तातडीच्या नोंदीचे महत्त्व याबाबत प्रत्यक्ष ज्ञान मिळाले.

उपक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांच्या सैद्धांतिक शिक्षण आणि सामाजिक जबाबदारी यांतील दरी कमी करणे हे होते. या अनुभवातून भावी विधी व्यावसायिकांना बालकल्याणासंबंधी आपले नैतिक व कायदेशीर कर्तव्य अधिक दृढपणे पार पाडण्याची प्रेरणा मिळाली.

विद्यार्थ्यांनी हा दिवस माहितीपूर्ण, समृद्ध आणि सामाजिकदृष्ट्या प्रभावी असल्याचे सांगितले. बालसंरक्षण व कायदेशीर जागरूकता वाढविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

# ना.शं. पाटील यांच्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील पुनाडे गावचे शिक्षक ना.शं. घरत सेवानिवृत्तीनंतर वयाच्या ८१ वर्षीही विद्यार्थ्यांना गणित विषयात मार्गदर्शन करीत आहेत. अशा सेवेत राहणारे ते तपस्वी आहेत, असे विचार साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल.बी.पाटील यांनी भाषणात मांडले. ते ना.शं.



पाटील यांच्या पावलां पावलांवर घडत गेलो या पुस्तकाच्या प्रकाशना समारंभात बोलत होते.

या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य ग.ह.ठाकूर यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक के.पां.म्हात्रे यांनी मानले तर देविदास पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सेवेत असताना अनेकांच्या सहकार्यामुळे मेहनत करणे सोपे झाले, असे विचार आपल्या मनोगतात ना.शं.पाटील गुरुजींनी मांडले.

या वेळी गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत, जयवंती पाटील, ग्रामस्थ ना.क.पाटील आणि दिलीप पाटील हातमोडे गजानन, महादेव भोईर या गुरुजींच्या विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील गुरुजींचं महत्व सांगून उपस्थितांना प्रभावित केले. या वेळी सूर्यकांत डाकी, मच्छिंद्र घरत,एल. एन.भगत, पूर्वा प्रसाद, अभिमन्यू ठाकूर, दर्शन मोकल, द्वारकानाथ पाटील, रसिक पाटील, जनार्दन ठाकूर, अविनाश पाटील इत्यादी ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

# प्रास्ताविकेच्या सामूहिक वाचनाने संविधान दिन साजरा





**अलिबाग : प्रतिनिधी**

२६ नोव्हेंबर रोजी देशभरात साजरा होणाऱ्या संविधान दिनानिमित्त जिल्ह्यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून संविधानाबद्दल जनजागृती करण्यात आली. या वेळी उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ. रवींद्र शेळके, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सुनील जाधव यांनी अलिबाग येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून संविधान दिन कार्यक्रमाची सुरुवात केली.

यानंतर अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी आणि नागरिकांनी संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन केले. श्री. शेळके यांनी संविधानातील मूल्ये, महत्व आणि नागरिकांची कर्तव्ये याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताची स्वतंत्र राज्यघटना अंगीकृत व अधिनियमित करण्यात आली होती. त्यानंतर राज्यघटना २६ जानेवारी १९५०पासून लागू झाली. त्या दिवसाचे औचित्य साधून संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

संविधान दिनानिमित्त समाजकल्याण विभागाच्या वतीने मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, अलिबाग-वरसोली येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. व्याख्याते प्रा.गणेश पाटील (पीएनपी महाविद्यालय) यांनी संविधानातील महत्वाची कलमे व त्यांचा उपयोग या विषयावर मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना संविधानाची मूलभूत तत्त्वे, अधिकार आणि कर्तव्ये यांची माहिती दिली.

कार्यक्रमास इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी वर्ग-२ मोनिका काळे, कार्यालय अधीक्षक माधुरी पाटील, गृहपाल अनिल मोरे तसेच कार्यालयातील कर्मचारी तसेच वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## सोशल मीडियावर तापलेय पालिका निवडणुकीचे रणांगण

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५करिता २ डिसेंबरला मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर एकीकडे घरोघरी जाऊन प्रचार केला जात आहे, तर दुसरीकडे फेसबुक, व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम या सोशल मीडियावरदेखील निवडणुकीचे रणसंग्राम तापू लागले आहे.

निवडणुकीला सामोरे जाणाऱ्या काही उमेदवारांनी आपल्या प्रचाराचे रील, मुलाखती, ऑनलाईन जाहिरात बनवून व्हॉट्सअॅपद्वारे पाठवून आपण कसे योग्य उमेदवार आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. याशिवाय जनतेच्या मनातला नेता आमचाच येणार, तुमचा हरणार, भावी नगराध्यक्ष व नगरसेवक कोण असेल याचा एक्झिट पोल घेण्यासाठी सोशल मीडियाचा वापर होतो.

निवडणुकीत तरुणांचे मत महत्त्वाचे आहे. त्यामुळे या सोशल मीडियावर होणारी चर्चादेखील निवडणुकीत कलाटणी देणारी ठरू शकते. उमेदवारांनीदेखील सोशल मीडियावर ग्रुप चालवणाऱ्या कार्यकर्त्यांना बळ दिले असल्याची चर्चा असून प्रचाराचे रान सोशल मीडियावर तापू लागले आहे.

यानिमित्ताने सोशल मीडियावर सर्वांची करमणूक होत असली तरी यामध्ये निवडणूक जवळ येईपर्यंत अॅडमिनची धकधक मात्र वाढू लागली आहे. निवडणुकीपर्यंत सोशल वॉर सुरू असेल.

## मंत्री गोगावलेंनी केला श्रीवर्धन दौरा

**श्रीवर्धन : बातमीदार**

महाराष्ट्र राज्याचे फलोत्पादन, रोजगार हमी व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी नुकताच श्रीवर्धन तालुक्याचा दौरा केला. या वेळी त्यांनी हरिहरेश्वर येथे श्री हरिहरेश्वराचे व काळभैरवाचे दर्शन घेऊन नगर परिषद निवडणुकीमध्ये चांगले यश मिळावे असे साकडे घातले आहे.



या वेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांवर मंत्री भरत गोगावले यांनी उत्तरे दिली. श्रीवर्धनच्या विकास आराखड्याबाबत ना. गोगावले यांना प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी आपापल्या मतदारसंघात ज्याला जे शक्य होईल ते केले आहे. श्रीवर्धनमध्ये आमची सत्ता आली तर आम्हीदेखील महाडप्रमाणे श्रीवर्धनचा विकास करू, असे आश्वासन दिले, तर रायगडच्या पालकमंत्रिपदाचा तिढा केव्हा सुटणार या प्रश्नावर उत्तर देताना आगामी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांनंतर हा प्रश्न मार्गी लागेल, असे वक्तव्य केले.

जीवना बंदर या ठिकाणी होत असलेल्या जेट्टीच्या कामामुळे मोठ्या प्रमाणात भराव झाल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारी पाण्याची पातळी खूप मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. याबाबत आपण योग्य ती चौकशी करू, असे सांगितले. श्रीवर्धन नगर परिषद हद्दीमध्ये झालेला जलशुद्धीकरण प्रकल्प व जलवाहिन्या बदलण्याचे काम याबाबतदेखील नागरिकांनी विचारणा केली. त्यानंतर ना. गोगावले यांनी श्रीवर्धन नगर परिषदेतील सर्व प्रभागांमध्ये उभ्या असलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांना मार्गदर्शन केले.

या दौऱ्यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, श्रीवर्धन तालुकाप्रमुख सुरेश मिरगळ, उपतालुकाप्रमुख ओमकार शेलार, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मोरे कॉलेजमध्ये मूल्य मार्गदर्शन

**रोहा : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे फाऊंडेशनच्या सौ. वरदा सुनील तटकरे महिला महाविद्यालय धाटाव येथे विद्यार्थिनींना भगवद्गीतेतील जीवनमूल्ये, सकारात्मक विचार व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

मार्गदर्शक सत्यप्रिया राव, सम्राज्ञी सुते, स्नेहा साळवी, निधी कदम, प्रितम कोळकर आणि सौ. सावंत यांनी भगवद्गीतेतील प्रेरणादायी शिकवणींचा आधुनिक जीवनाशी संबंध जोडत विद्यार्थिनींना आपले प्रभावी विचार सांगितले. महाविद्यालयाच्या महिला सक्षमीकरण कक्षप्रमुख प्रा दिपाली वारंगे आणि प्रा. विजीता पडवळ यांनी सत्राचे नियोजन केले.

## माणगाव आयसीडीसीएल प्रकल्प येथे एमसीएल-विद्या पालवी प्रकल्पाचे हस्तांतरण

**माणगाव : बातमीदार**

गेल्या तीन वर्षांपासून माणगाव तालुक्यात राबविण्यात आलेल्या एमजीएल-विद्या पालवी प्रकल्पाचा हस्तांतर कार्यक्रम २५ नोव्हेंबर रोजी उत्साहात पार पडला. प्रकल्पामार्फत पूर्वप्राथमिक बालशिक्षणाचे काम तालुक्यातील २४० अंगणवाड्यांपर्यंत यशस्वीरीत्या पोहचले आहे.



या उपक्रमाचे पुढील काळातील कार्यान्वयन स्थानिक आयसीडीसीएल प्रणालीमार्फत चालू राहावे या उद्देशाने तालुक्यातील सर्व अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका आणि बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रकल्पासाठी आर्थिक सहकार्य करणारे महानगर गॅस लिमिटेडचे चीफ मॅनेजर सुशांता राऊत, सुनील रणखांबळे आणि सीएसआर असिस्टंट मॅनेजर प्रियांका दळवी तसेच क्वेस्ट संस्थेचे मॅनेजर नितीन मराडे उपस्थित होते.

कार्यक्रमात मॉडेल अंगणवाडी मदतनीसांचा सत्कार आणि प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. अंगणवाड्यांचे बालशिक्षण केंद्रात रूपांतर घडवून आणण्यासाठी मदतनीसांनी निभावलेली भूमिका विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आली.

पालवी प्रकल्पाच्या प्रवासात आलेले अनुभव, स्वतःमध्ये झालेला आत्मविश्वासाचा विकास आणि मुलांमधील सकारात्मक बदल याबाबत मदतनीस, सेविका व पर्यवेक्षिका यांनी मनोगते व्यक्त केली. उपस्थित मान्यवरांनी अंगणवाड्यातील सुधारलेल्या बालशिक्षणासाठी तसेच सेविकांच्या वाढलेल्या आत्मविश्वासासाठी सर्वांचे कौतुक केले.

या कार्यक्रमात पालवी प्रकल्पाच्या संपूर्ण टीमला अभिनंदन पत्र देऊन कौतुक व आभार व्यक्त करण्यात आले. प्रकल्पाच्या तीन वर्षांच्या कार्यकाळात अंगणवाड्यांमध्ये झालेला शैक्षणिक बदल आणि सेविकांचा आत्मविश्वास हा या उपक्रमाचा महत्त्वाचा ठेवा ठरल्याचे उपस्थितांनी सांगितले.

## सुधागडात हॉलसाठी शासकीय जागा उपलब्ध करून देण्याची मागणी

### कुंभार समाजाचे तहसीलदारांना निवेदन

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड नगरपंचायत हद्दीतील कुंभारआळी येथील समाजाने त्यांच्या दीर्घकाळच्या मागणीबाबत शासनाचे लक्ष वेधले आहे. वाढती लोकसंख्या आणि सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व लक्षात घेता समाज हॉल उभारण्यासाठी शासकीय जागा उपलब्ध करून देण्याची मागणी अॅड. प्रवीण कुंभार यांच्यासह कुंभार समाज प्रतिनिधींनी तहसीलदार यांच्याकडे केली आहे.



कुंभार समाजामार्फत सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटलेय की, कुंभारआळी परिसरात राहणाऱ्या समाजाची संख्या लक्षणीय आहे. विवाह सोहळे, सांस्कृतिक कार्यक्रम, धार्मिक उत्सव, शैक्षणिक उपक्रम तसेच समाज विकासाच्या बैठका घेण्यासाठी योग्य, प्रशस्त आणि स्वतंत्र सुविधायुक्त इमारत नसल्याने समाजातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. याबाबत नगरपंचायत व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देण्यात आले असून कुंभार समाजाच्या सर्व बांधवांनी ही मागणी कळकळीची असल्याचे सांगितले आहे. समाज हॉल उभारला गेल्यास युवकांच्या उपक्रमांना चालना, महिलांसाठी सामूहिक उपक्रमांची सोय तसेच स्थानिक विकास प्रक्रियेला गती मिळेल, असा विश्वास समाज बांधवांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनी निवेदन प्राप्त झाल्याची नोंद घेतली असून पुढील प्रक्रिया नियमानुसार करण्यात येईल, असे तहसीलदार उत्तम कुंभार यांनी सांगितले.

## खालापुरात ग्रामपंचायतींमध्ये भारतीय संविधानाचे वाचन

**चौक : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहून पूर्ण करून भारतीयांना दिले. त्याचे वाचन संविधान दिनानिमित्त खालापूर तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये करण्यात आले.

भारतात २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. १९४९मध्ये याच दिवशी भारतीय संविधान स्वीकारण्यात आले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मसुदा समितीचे नेतृत्व केले आणि संविधानाच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यांसारख्या मूल्यांची आठवण करून देणे आणि त्यांचे पालन करण्यासाठी प्रेरित करणे हाच संविधान दिनाचा प्रमुख उद्देश आहे. याला राष्ट्रीय विधी दिन असेही म्हणतात. खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये संविधानाचे वाचन करून हा दिन साजरा करण्यात आला.



## अंजुमन कॉलेजचे विशेष निवासी शिबिर



**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरूड-जंजिराच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागातर्फे अमली पदार्थ व तंबाखूमुक्त भारतासाठी युवा या मुख्य संकल्पनेवर आधारित सात दिवसीय विशेष निवासी शिबिर शिघ्रे येथे २५ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.

शिबिराच्या उद्घाटन समारंभास मुख्य अतिथी म्हणून पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी यांच्यासह महाविद्यालयाचे चेअरमन जैनुद्दीन कादरी, प्राचार्य डॉ. साजिद शेख उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थमुक्त जीवनशैलीचे महत्त्व पटवून देत समाजाच्या सेवेसाठी पुढे येण्याचे आवाहन केले.

शिबिरात महाविद्यालयातील ५० विद्यार्थी सहभागी झाले असून गाव परिसर स्वच्छता, वृक्षसंवर्धन, सर्वेक्षण कार्य, आरोग्य-जागृती उपक्रम, नेत्रतपासणी व मोतीबिंदू निदान शिबिर, शासकीय योजनांची माहिती, आर्थिक साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन, सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा आणि व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. फिरोज शेख, प्रा. अल्ताफ फकीर व प्रा. स्वालीहा करबारी मेहनत घेत आहेत.

## नागोठणे कोएसो विद्यासंकुलात स्नेहसंमेलन



**नागोठणे : बातमीदार**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठणे येथील श्रीमती गु.रा. अग्रवाल विद्यामंदिर, कै.स.प्र. जैन कनिष्ठ महाविद्यालय व कै. अ.जे. जैन प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ बुधवारी (दि. २६) उत्साहात झाले.

कार्यक्रमास श्रीमती गु. रा. अग्रवाल विद्यामंदिर व कै. स. प्र. जैन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य देविदास पवार, आनंदीबाई प्रधान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश भगत, माजी प्राचार्य डॉ. संदेश गुरव, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका अनघा लोखंडे, कार्याध्यक्ष भरत भांगरे, शिक्षक प्रतिनिधी तथा उपकार्याध्यक्ष अबेसिंग गावित, भास्कर सोलेगावकर, रमेश झेडगे, नेताजी गायकवाड, अनिल तिरमले, संतोष गोळे आदी उपस्थित होते.

वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजिलेल्या विज्ञान, रांगोळी, चित्रकला व हस्तकला प्रदर्शनाचे उद्घाटन तसेच हस्ताक्षर या हस्तलिखिताचे प्रकाशन देखील करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका मेघना म्हात्रे यांनी केले, तर आभार शिक्षक रमेश झेडगे यांनी मानले. स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी एनएसएस ग्रुपच्या विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

## माणगावात संविधान दिन साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील रायगड जिल्हा परिषद विकास कॉलनी या शाळेत अमृत महोत्सवी संविधान दिन बुधवारी (दि. २६) विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमास पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी शुभदा पाटील, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, उतेखोल केंद्राचे प्रमुख शंकर शिंदे, उर्मिला मोरे, पंचायत समिती कर्मचारीवृंद, विकास कॉलनी शाळेच्या मुख्याध्यापिका पूर्वा येलवे, निलम गायकवाड, पालकवर्ग, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी सर्वप्रथम संविधान प्रतिज्ञा (उद्देशिका) घेण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांची शाळेपासून पंचायत समिती कार्यालयापर्यंत रॅली काढण्यात आली. तेथे विद्यार्थ्यांनी संविधानावर आधारित पथनाट्य सादर केले.



# द. आफ्रिकेचा २५ वर्षांनी ऐतिहासिक विजय

## भारताचा सर्वात मोठा कसोटी पराभव; मालिकाही गमावली

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने गुवाहाटी कसोटी सामना तब्बल ४०८ धावांनी गमावला. कसोटी क्रिकेटच्या आतापर्यंतच्या इतिहासातील टीम इंडियाचा हा सर्वात मोठा पराभव ठरला. यासह दक्षिण आफ्रिकेविरुद्धची मायदेशातील मालिकाही २-०ने भारताने गमावली. २५ वर्षांनी भारतीय संघाला व्हाइटवॉश देत दक्षिण आफ्रिकेच्या संघाने इतिहास रचला आहे.




दक्षिण आफ्रिकेच्या संघाने पहिल्या डावातील ४४९ धावा आणि दुसऱ्या डावातील २६० धावांच्या जोरावर ५४९ धावांचे विक्रमी धावसंख्या उभारली होती. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघ दुसऱ्या डावात १४० धावांत आटोपला. दक्षिण आफ्रिकेच्या संघाने दिलेल्या मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना भारतीय संघाने चौथ्या दिवसाअखेरच पहिल्या दोन विकेट्स गमावल्या. पाचवा आणि अखेरचा दिवस खेळून काढत सामना अनिर्णित राखण्यासाठी भारतीय संघ मैदानात उतरला, पण पुन्हा एकदा फलंदाजीत फ्लॉप शो पाहायला मिळाला. दक्षिण आफ्रिकेच्या संघाने भारतीय संघाला सलग दुसऱ्या सामन्यात पराभूत करत मालिका २-० अशी आपल्या नावे केली.

पहिल्या डावात २०१ धावांवर आटोपलेल्या भारतीय संघाला दुसऱ्या डावात दक्षिण आफ्रिकेच्या संघाने १४० धावांवरच गारद केले. सायमन हार्मर याने सर्वाधिक सहा विकेट्स घेतल्या. याशिवाय केशव मराहाज याने दोन, तर मुथुसामी आणि मार्को यान्सेन यांनी प्रत्येकी एक विकेट आपल्या खात्यात जमा केली. भारताकडून रवींद्र जडेजाने अर्धशतकी खेळी केली. त्याने ८७ चेंडूंचा सामना करताना ५४ धावा केल्या. यामध्ये चार चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. जडेजा वगळता सर्व अपयशी ठरले.

याआधी २०००मध्ये भारतीय संघावर अशी नामुष्की ओढावली होती. हान्सी क्रोन्ये याच्या नेतृत्वाखालील दक्षिण आफ्रिकेच्या संघाने भारतीय संघाला २-० असे पराभूत केले होते. त्यानंतर आतापर्यंत एकदाही दक्षिण आफ्रिकेला भारतीय मैदानात कसोटी मालिका जिंकता आली नव्हती. अपराजित कर्णधार असा टॅग असलेल्या टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखालील २५ वर्षांचा दुष्काळ संपवत दक्षिण आफ्रिकेने मालिका विजयाचा पराक्रम करुन दाखवला. घरच्या मैदानातील मागील तीन कसोटी मालिकेतील भारतीय संघाचा हा दुसरा लाजिरवाणा पराभव ठरला. याआधी न्यूझीलंडच्या संघाने टीम इंडियाला ३-० असे क्लीन स्वीप केले होते.

# रायगड क्रिकेट संघ सुपर लीगमध्ये



**अलिबाग : अलिबाग**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या वतीने आयोजित १४ वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा दोन दिवसीय निवड चाचणी स्पर्धेत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या (आरडीसीए) संघाने दमदार कामगिरी करत सुपर लीगमध्ये दिमाखदार प्रवेश मिळवला आहे.

पुणे येथे ही स्पर्धा सुरू आहे. त्यामध्ये साखळी फेरीच्या झालेल्या पाच सामन्यांत रायगडच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी केली असून १९ गुण प्राप्त करत सुपर लीग फेरीच्या सामन्यांसाठी आपला प्रवेश निश्चित केला आहे. साखळी फेरीतील झालेल्या पाच सामन्यांमध्ये रायगडच्या संघाने दक्षिण विभाग व स्टार क्रिकेट अकॅडमी संघावर एका डावाने दणदणीत विजय मिळवला तर लातूर जिल्ह्याच्या संघावर पहिल्या डावाच्या आधारे विजयी मिळवला असून बलाढ्य अशा केडन्स क्रिकेट अकॅडमी व मेट्रो क्रिकेट अकॅडमी संघांबरोबरचा सामना अनिर्णित ठेवण्यात रायगडच्या संघाला यश आले.

या सामन्यांमध्ये रायगडचा तंत्रशुद्ध तडाखेबाज फलंदाज आरव बरळ याने सर्वाधिक ४१५ धावा काढल्या, ज्यामध्ये दोन शतक व एका अर्धशतकाचा समावेश आहे. अष्टपैलू खेळाडू व कर्णधार देव सिंग याने ३८७ धावा केल्या. त्यामध्ये त्याने दोन शतक व एक अर्धशतक केले. गोलंदाजी विभागात भेदक गोलंदाज विराज थोरातने सर्वाधिक १९ बळी घेतले. त्यामध्ये एका डावात पाच बळी त्यानी दोन सामन्यांत घेतले, तर देव सिंगने १५ फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला.

रायगड संघाचे प्रशिक्षक सागर कांबळे यांनी खेळाडूंनी मैदानावर केलेल्या कामगिरीवर समाधान व्यक्त केले आहे. सुपर लीगचे सामने २७ नोव्हेंबरपासून पुण्यातील विविध मैदानांवर होणार असून रायगड जिल्ह्याचा संघ जेट्स क्रिकेट अकॅडमी, केडन्स क्रिकेट अकॅडमी, चंद्रवोस क्रिकेट अकॅडमी व सहारा क्रिकेट अकॅडमीच्या संघाबरोबर खेळणार आहे.

गेल्या क्रिकेट हंगामात रायगडचा १६ वर्षाखालील मुलांचा संघदेखील सुपर लीगसाठी पात्र झाला होता. रायगडचा ज्युनिअर वयोगटातील संघ सातत्याने यश मिळवत असल्याबद्दल आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह इतर पदाधिकारी व सदस्य, जिल्ह्यातील क्रिकेटप्रेमींनी संघातील खेळाडू, प्रशिक्षक व सिलेक्टर्स यांचे अभिनंदन केले आणि पुढील सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# नेवाळी येथे आमदार चषक क्रिकेट स्पर्धा : भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नेवाळी येथील आई गावदेवी प्रसन्न गौरी स्पोर्ट्सच्या वतीने आणि राजेशशेठ काथारा यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार चषक २०२५ भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि. २६) झाले.

स्पर्धा नेवाळी येथे २६ नोव्हेंबर तर २ डिसेंबर या कालावधीत रंगणार आहे. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकास एक लाख, द्वितीय क्रमांकास ५० हजार, तर तृतीय, चौथ्या आणि पाचव्या क्रमांकाला प्रत्येकी २५ हजार रुपये, चषक आणि फ्रीज देऊन गौरविण्यात येणार आहे. याशिवाय उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक आणि मालिकावीरसाठी आकर्षक बक्षीसे देण्यात येणार आहेत.



स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, तालुका सरचिटणीस यतीन पाटील, राजेश काथारा, दीपक शेळके, मोतीराम काथारा, मारुती काथारा, हरिश्चंद्र फडके आदी उपस्थित होते.



## हिटमॅन रोहित शर्मा पुन्हा नंबर वन!

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने जाहीर केलेल्या नव्या एकदिवसीय क्रिकेटमधील फलंदाजांच्या क्रमवारीत भारताचा हिटमॅन रोहित शर्मा पुन्हा एकदा अव्वलस्थानी आला आहे. खास गोष्ट ही की, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेआधी एकही सामना न खेळता रोहितला एका स्थानाच्या सुधारणेसह पुन्हा नंबर वन फलंदाज ठरला आहे. याआधी न्यूझीलंडच्या डॅरिल मिचेलने रोहित शर्माचा ताज हिसकावून घेतला होता, पण आठवड्याभरात त्याने हा ताज पुन्हा गमावल्याचे पहायला मिळत आहे.

आयसीसीच्या नियमानुसार एखादा फलंदाज वनडे संघातून बाहेर असेल तर त्याचा क्रमवारीवर परिणाम होतो. याच नियमाचा डॅरिल मिचेल याला फटका बसला आहे. आयसीसीच्या वनडे क्रमवारीत या नियमाच्या फायद्यासह रोहित पूर्वीच्या ७८१ रेटिंग पॉइंट्ससह अव्वलस्थानी आहे. न्यूझीलंडचा संघ काही वनडे सामन्यात मिचेलशिवाय मैदानात उतरला अन् या फलंदाजाच्या रेटिंग पॉइंट्समध्ये घसरण झाली. आता त्याच्या खात्यात ७६६ रेटिंग पॉइंट्स असून तो दुसऱ्या स्थानावर आहे. वनडे क्रमवारीत या बदलाशिवाय अन्य कोणताही मोठा बदल झाल्याचे दिसत नाही.

# उर्विल पटेलचे वादळी शतक

## १८३ धावांचे लक्ष्य १२.३ षटकांत गाठले

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

गुजरातचा सलामीवीर आणि कर्णधार उर्विल पटेलने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५मध्ये पुन्हा एकदा आपल्या वादळी फलंदाजीने क्रिकेटजगताला चकित केले. त्याने फक्त ३१ चेंडूत शतक ठोकून एक नवीन आणि अनोखा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे.

एलिट ग्रुप सी मधील पहिला सामना हैदराबादच्या जिमखाना ग्राउंडवर गुजरात आणि सर्विसेस या दोन संघांमध्ये खेळला गेला. या सामन्यात गुजरातचे प्रतिनिधित्व करणाऱ्या १७ वर्षीय उर्विल पटेलने आपल्या वादळी फलंदाजीच्या जोरावर सर्वांना अचंबित केले. सर्व्हिसेसविरुद्धच्या सामन्यात उर्विल पटेलने सलामीला येत ३१ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. या खेळीत त्याने ११ चौकार आणि आठ षटकार मारले. सामन्यादरम्यान त्याचा स्ट्राईक रेट ३२२पेक्षा जास्त होता. उर्विलच्या या तुफानी शतकी खेळीमुळे गुजरातने १८३ धावांचे मोठे लक्ष्य केवळ १२.३ षटकांत सहज गाठले आणि संघाला मोठा विजय मिळवून दिला.



उर्विल आता टी-२० क्रिकेटमध्ये ३५पेक्षा कमी चेंडूत दोनदा शतक करणारा जगातील पहिला फलंदाज ठरला आहे. यापूर्वी त्याने २०२४मध्ये त्रिपुराविरुद्धच्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये फक्त २८ चेंडूत शतक झळकावले होते. टी-२० क्रिकेटमधील सर्वात जलद शतकाचा विक्रम सध्या साहिल चौहानच्या (२७ चेंडूत) नावावर आहे.

उर्विल पटेल गेल्या हंगामात चेन्नई सुपर किंग्जसाठी तीन सामने खेळले, पण त्याला विशेष मोठी खेळी करता आली नाही. त्याने तीन सामन्यांत फक्त ६८ धावा केल्या, मात्र सीएसकेने त्याला या हंगामातही संघात कायम ठेवले आहे.




# टेम्बा बावुमाचा विश्वविक्रम

**नवी दिल्ली** : दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमा याने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. आपल्या कारकिर्दीतील पहिले १२ कसोटी सामने अजिंक्य राहणारा तो कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील पहिला कर्णधार ठरला. या १२ सामन्यांमध्ये बावुमाच्या नेतृत्वाखालील संघाने ११ सामने जिंकले आहेत, तर केवळ एक सामना अनिर्णित राहिला आहे. यापूर्वी हा अद्भूत विक्रम इंग्लंडचा माजी कर्णधार बेन स्टोक्स आणि ऑस्ट्रेलियाचे माजी दिग्गज लिंडसे हॅसेट यांच्या नावावर होता. या दोघांनीही त्यांच्या पहिल्या १२ कसोटी सामन्यांमध्ये १० विजय नोंदवले होते, पण बावुमाने नवा बेंचमार्क सेट केला आहे.



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**Ramsheth Thakur Public School, Kharghar**

CBSE Affiliation No. 1130299 U-DISE 27240806133
**Plot No. 11 & 11A, Sector 19, Kharghar, Navi Mumbai 410210**
Email Id – **rtpskhgr@gmail.com** Website – **https://www.rtpsk.in**

**STAFF REQUIRED**

**Applications are invited for the following posts for the Academic Year 2025-2026 with immediate appointment**

| POST | SUBJECT | QUALIFICATION |
|---|---|---|
| PGT (1) | English (1) | M.A., B.Ed. in the Subject of English with teaching Experience in Senior Secondary. (With atleast 50% Marks) |
| TGT (1) | Science (1) | M.Sc., B.Ed. in the Subject of Science with teaching Experience in Secondary. (With atleast 50% Marks) |
| TGT (1) | Maths (1) | M.Sc., B.Ed. in the Subject of Mathematics with teaching Experience in Secondary. (With atleast 50% Marks) |
| PRT (1) | Marathi (1) | B.A. / M.A., B.Ed. in the Subject of Marathi with teaching Experience in Primary & Secondary. (With atleast 50% Marks) |
| PRT (1) | PT Teacher (1) | BA /B.Sc. / B.Com. and B.P.Ed./ M.P.Ed. (With atleast 50% Marks). |

**NOTES:-**
- **Only those candidates who have passed STD - X from an English medium School should apply.**
- **All Applicants must have knowledge of working on Computer.**
- Interested candidates can send their resume with passport size photograph and self-attested copies of documents to the **Chairman, JBSP Sanstha, Panvel at, Ramsheth Thakur Public School, Kharghar, Plot No. 11 & 11A, Sector-19, Kharghar, Navi Mumbai-410210.**
- Candidates may also submit the application by email to **rtpskhgr@gmail.com** or WhatsApp on **9987077043** on or **Before 03/12/2025 (Wednesday).**
- **For additional information contact :**
**Mrs. Raj Aloni, Principal, RTPS, Kharghar – 9821537023**
**Mr. Ajay Kumar Yadav – 9664268045**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**CHAIRMAN**
JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA PANVEL



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**Ramsheth Thakur Public School, Kharghar**

CBSE Affiliation No. 1130299 U-DISE 27240806133
**Plot No. 11 & 11A, Sector 19, Kharghar, Navi Mumbai 410210**
Email Id – **rtpskhgr@gmail.com** Website – **https://www.rtpsk.in**

**Applications are invited for the following posts for the Academic Year - 2026-2027**

**SALIENT FEATURES OF THE SCHOOL**

| | |
|---|---|
| Reputed CBSE Affiliated School | Total 120 Divisions from Nursery to XII Std. |
| Excellent Results | State of the Art Infrastructure and Excellent Learning Resources. |
| School in Two Shifts | Total 4500 Students from Nursery to XII Std. |
| Recipient of District, State, National and International Level Awards in the Academics, Curricular and Extracurricular Activities. | |

| POST | ELIGIBILITY |
|---|---|
| PRINCIPAL (1) | **Qualifications** - Post Graduate with B.Ed. / M.Ed. from recognized university & D.S.M. (Diploma in School Management) **Experience** - 10 to 15 years of Teaching experience including 10 years in Administrative position in CBSE School (Refer CHAPTER-IX of Affiliation Bye-Laws of Minimum Qualifications – PRINCIPAL / HEAD OF THE SCHOOL) |
| VICE-PRINCIPAL (1) | **Qualifications** - Post Graduate with B.Ed. / M.Ed. from recognized university & D.S.M. (Diploma in School Management) **Experience** - 10 to 15 years of Teaching experience including 05 years in Administrative position in CBSE School |
| COORDINATOR (1) | **Qualifications** - Post Graduate with B.Ed. / M.Ed. from recognized university & D.S.M. (Diploma in School Management) **Experience** - 10 to 15 years of Teaching experience including 02 years in Administrative position in CBSE School |

- **Only those candidates who have passed Class X from an English Medium School should apply**
- **Excellent command over the English language.**

**NOTES:-** Candidates should submit their resume, a passport-size photograph and self-attested copies of all relevant documents along with Application.

Application may be sent through Posts addressed to the **Chairman, J.B.S.P. Sanstha's Ramsheth Thakur Public School, Kharghar, Plot No: 11 & 11A, Sector-19, Kharghar, Navi Mumbai, 410210** OR through email to **rtpskhgr@gmail.com**

The last date for the submission of application is **Wednesday, 10/12/ 2025**

For any query, please contact to **9821537023 / 9870891020 / 9664268045**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**CHAIRMAN**
JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA PANVEL

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com